दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ०३ अंक–३५० मंगळवार दि.०२ एप्रिल २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 ■ पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

संवेदना बोथट झाल्यात...

सध्या देशात लोकसभा निवडणुकीचा ज्वर चढलेला आहे. अगदी गल्लीबोळातल्या राजकीय बातम्यांवर व घडामोडींवरही जोरदार व गरमागरम चर्चा घडतायत. 'विकते तेच पिकते' या बाजारपेठेच्या तत्त्वानुसार माध्यमांमध्ये राजकीय बातम्या व घडामोडींचा महापूर आहे. अभिव्यक्तीचे व्यासपीठ बनलेल्या समाज माध्यमांचाही त्याला अपवाद नाही हे विशेष! मात्र लडाखचे, तेथील पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, स्थानिकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न सरकारच्या कानावर घालण्यासाठी सोनम वांगचूक यांनी गोठवणाऱ्या थंडीत मीठ आणि पाणी घेऊन २१ दिवस उपोषण केले.

लिंक उघड करताच खात्यातले ५० हजार गायब

बीडः येथील डॉ.अनिल भानूदास सानप यांना दि.१८ मार्च रोजी सकाळी एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून कॉल आला. समोरच्या अनोळखी व्यक्तीने डॉ.सानप यांना तुमचे नेट बँकिंग बंद होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर डॉ.सानप यांना विश्वासात घेत त्याने त्यांना एक लिंक पाठवत ती उघडायला सांगितली. डॉक्टरांनी ती लिंक ओपन करून माहिती भरली. यानंतर त्यांच्या खात्यातून ४४ हजार, ५ हजार आणि १ हजार अशा टप्प्यात ५० हजार रूपये कपात झाले. पैसे कटल्याचा मेसेज आल्यावर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ सायबर पोलिस ठाणे गाठत तक्रार दिली.

जायफळ टॅफी आविष्काराला मिळाले पेटंट

शेतकऱ्याला प्रत्येक झाडामागे मिळणार ५६०० रुपये

मुंबई । प्रतिनिधी

गोव्याच्या जायफळ टॅफी आविष्काराला पेटंट मिळाले आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना प्रत्येक झाडामागे ५,६०० रुपये अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळणार आहे. जायफळ हे भारतातील एक महत्त्वपूर्ण मसाला पीक असून, त्याची प्रामुख्याने जायफळ बी आणि गर यासाठी लागवड केली जाते. आता याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

गोव्यातील भारतीय कृषी संशोधन परिषद – केंद्रीय तटीय कृषी संशोधन केंद्रा मधील डॉ. ए.आर. देसाई आणि त्यांच्या नेतृत्वाखालील चमूच्या ''जायफळ टॅफी तयार करण्याची प्रक्रिया आणि त्यापासून बनवलेले उत्पादन नावाच्या शोधाला पेटंट

मिळाले आहे. यासाठी क्रमांक ५२८११९ (अर्ज क्रमांक २०१६२१०१२४१४, दि. ८ एप्रिल २०१६) प्रदान करण्यात आला आहे. जायफळ, भारतातील एक महत्त्वपूर्ण मसाला पीक आहे. त्याची प्रामुख्याने जायफळ बी आणि गर यासाठी लागवड केली जाते. कापणीनंतर बहुतेक वेळा जायफळाचे बीज कोष शिल्लक राहतात. या शिल्लक उप-उत्पादनाची दखल घेत गोव्यातील आयसीएआर – सीसीएआरआय ने जायफळ बीज कोषांचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या उद्देशानेएक उपाय विकसित केला आहे. जायफळ बीज कोष टॅफी या नाविन्यपूर्ण उत्पादनामध्ये महत्त्वपूर्ण पौष्टिक मूल्य असून ते ताज्या फळाच्या ८० ते ८५ टक्के भाग बनते. कृत्रिम संरक्षकांशिवाय सामान्य तापमानात १२ महिन्यांपर्यंत सोयीस्करपणे साठवले जाऊ शकते. यामुळे हे उत्पादन एक टिकाऊ आणि किफायतशीर उपाय बनले आहे. या नव्या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीमुळे, शेतकऱ्यांना पारंपरिक जायफळ मसाल्याच्या उत्पादनांमधून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त प्रत्येक झाडामागे ५,६०० रुपये अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळणार आहे. हे उत्पादन तयार करण्याच्या प्रक्रियेची साधेपणा, त्यासाठी अगदी थोड्या उपकरणांची आवश्यकता आणि व्यावसायिक व्यवहार्यता या वैशिष्ट्यांमुळे कृषी-उद्योजकता, स्वयं-सहायता गट, लघु आणि मध्यम-स्तरीय अन्न उद्योग आणि कृषी-पर्यावरण पर्यटन केंद्रांसह विविध क्षेत्रांमध्ये त्याची व्यापक अंमलबजावणी होऊ शकेल. या आविष्काराच्या तंत्रज्ञान हस्तांतरातून गोव्यातील नेत्रावली येथील मेसर्स तनशीकर स्पाइस ◀◀ पान २ वर

ईव्हीएम फिक्सिंगच्या आरोपांविरोधात भाजपची निवडणूक आयोगात तक्रार

नवी दिल्ली । वृतसंस्था

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीने रविवारी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर लोकशाही वाचवा सभेचे आयोजन केले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या सभेतून भाजपवर मॅच फिक्सिंग आणि ईव्हीएम हॅकिंगसारखे आरोप केले. आता राहुल गांधींच्या याच वक्तव्याविरोधात भाजपने निवडणूक आयोगात तक्रार दाखल केली आहे.

राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर लोकसभा निवडणुकीत मॅच फिक्सिंग केल्याचा आरोप केला होता. तसेच, भाजप त्यांच्या प्रयत्नांमध्ये यशस्वी झाला, तर देशाची घटना बदलली जाईल आणि लोकांचे अधिकार नष्ट होतील. ही मॅच फिक्सिंग थांबवण्यासाठी संपूर्ण ताकदीने मतदान करण्याचे आवाहनदेखील राहुल यांनी केले होते. मॅच फिक्सिंगशिवाय, ईव्हीएम ◀◀ पान २ वर

भाजपचे प्रत्युत्तर

राहुल यांच्या आरोपावर पलटवार करताना भाजपचे प्रवक्ते शेहजाद पूनावाला म्हणाले की, पूर्वीच्या काँग्रेस सरकारने त्यांच्या प्रमुख कुटुंबाला फायदा मिळवून देण्यासाठी श्रीलंकेशी करार केला आणि आपले कच्चातीवू बेट त्यांना देऊन टाकले. फूट पाडणारे राजकारण काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे. १९४७ मध्ये धर्माच्या आधारावर देशाचे विभाजन करून जम्मू-काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या ताब्यात देण्यास काँग्रेसने मागेपुढे पाहिले नाही, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

महायुतीचे शिलेदार पवारांच्या जाळ्यात अडकणार?

धास्ती विधानसभेची; पंकजा मुंडे यांच्यासाठी धोक्याची घंटा

अशोक खाडे/बीड

राज्याच्या राजकारणात बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांच्यानंतर सध्या शरद पवार हे एकमेव नेते आहेत की जे कधी काय करतील, हे स्वतः च्या पक्षातील नेत्यांनाही कळत नाही. सध्या बीड लोकसभा मतदार संघात पवार असचं काही तरी करण्याच्या मुडमध्ये असल्याचे बोलले जात आहे. तगडा उमेदवार देण्याबरोबरच बीड जिल्ह्यातील महायुतीचे बरेच शिलेदार विधानसभेच्या धास्तीने पवारांच्या जाळ्यात अडकणार असल्याची चर्चा आहे. तसे झाले तर पंकजा मुंडे यांच्यासाठी ती धोक्याची घंटा असेल. आष्टी, गेवराई आणि माजलगाव विधानसभा मतदारसंघात महायुतीला दे-धक्का होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

विधानसभेचीच खरी मेख!

लोकसभा झाल्यावर काही महिन्यात विधानसभा निवडणुक होणार असून लोकसभेत ज्या पध्दतीने झाला त्या पध्दतीनेच विधानसभा निवडणुकीत मतदारसंघाचा तिढा महायुतीत होऊ शकतो. गेवराईचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार आहेत, भाजप त्यांच्यासाठी आग्रही असू शकेल पण सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचे जिल्ह्यात वर्चस्व आहे. त्यांचे जिवाभावेचे मित्र अमरसिंह पंडीत यांच्यासाठी ते शेवटपर्यंत गेवराईवरील दावा सोडणार नाहीत. दुसरीकडे माजलगावात राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके आहेत. त्यामुळे त्यांचा दावा योग्य आहे पण रमेश आडसकर आणि मोहन जगताप यांनी काय करावे, त्यांची तर कोणी बाजु लावून धरेल, असेही चित्र नाही. कारण पंकजा मुंडे या केंद्रात गेलेल्या असतील. त्यानंतर आष्टी मतदार संघातही अशीच स्थिती आहे. आ. बाळासाहेब आजबेंसाठी धनंजय मुंडे शेवटपर्यंत लावून धरतील, आ. सुरेश धस आणि भीमराव धोंडे यांनाही विधानसभा लढवायची आहे. त्यामुळे त्यांच्यासमोरही उमेदवारीचीच खरी मेख आहे.

प्रवेश..आता नाही तर कधीच नाही

महायुतीमधील काही शिलेदारांनी आपण लोकसभा निवडणुक झाल्यावर शरद पवार यांच्या पक्षात जावू, असा विचार केलेला असावा. मात्र आता नाही तर कधीच नाही, या मुडमध्ये शरद पवार असून ज्यांना विधानसभा लढवायची त्यांनी लोकसभेतच प्रवेश करायचा, अशी भुमिका घेतल्याचे समजते.

गोपीनाथ मुंडे आणि बीड जिल्ह्याचे नातेच वेगळे होते. मुंडे साहेबांच्या इशाऱ्यावर कोणत्याही निवडणुकीत मतदान केले जात होते. अनेक दिग्गजांना त्यामुळे पराभूत व्हावे लागले. जादुची कांडी हा शब्दप्रयोग त्या काळी लोकप्रिय झाला होता. त्यांच्यानंतर बीड लोकसभेच्या दोन निवडणुकीत मुंडे यांच्या अकाली निधनामुळे सहानुभुतीची लाट पहायला मिळाली. प्रितम मुंडे या दोनवेळा विक्रमी ◀◀ पान २ वर

आठवीच्या वर्गातील मुलगी झाली आई

बीडः साधारण नऊ महिन्यापूर्वी पीडितेच्या मोठ्या बहिणीचे लग्न होते. त्यामुळे सर्वच कामात व्यस्त होते. याच संधीचा गैरफायदा घेत चुलत्यानेच अवघ्या १४ वर्षाच्या आपल्या पुतणीवर अत्याचार केला. त्यानंतर पीडिता आपल्या आई-वडिलांसोबत ऊसतोडणीसाठी कोल्हापुरला गेली. दोन दिवसांपूर्वी कारखाना संपल्याने परत बीडला येत असतानाच कळंबजवळ कळा सुरू झाल्या. रूग्णालयात दाखल केल्यावर तिची प्रसुती झाली. या प्रकरणी चुलत्याविरोधात पिंपळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, पीडिता ही आठवीच्या वर्गात शिक्षण घेत असल्याचे सांगण्यात आले.

ज्ञानवापी तळघरात पूजा सूरु राहणार

स्थगितीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली । वृतसंस्था

ज्ञानवापी मशिदीच्या 'व्यास तहखाना' या तळघरात हिंदू पक्षाला पूजेला परवानगी देण्याच्या वाराणसी न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास सोमवारी (दि.१एप्रिल) सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने दोन्ही समुदायांना धार्मिक प्रार्थना करता याव्यात यासाठी पक्षकारांना ज्ञानवापी परिसरात यथास्थिती राखण्याचा ◀◀ पान २ वर

दोन्ही समुदाय अटींमध्ये धार्मिक पूजा करू शकतात – सर्वोच्च न्यायालय

सोमवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, 'व्यास तहखाना'बाबत दिलेला आदेश यथास्थिती राखणे योग्य आहे. जेथे पूजा केली जाते त्या तळघरात प्रवेश करणे आणि मुस्लिम प्रार्थना करणारे क्षेत्र वेगळे आहे. जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मुस्लिम समुदायांकडून नमाज अदा केली जात आहे. तेहखान्यातील पूजा केवळ हिंदू धर्मगुरूंपुरतेच मर्यादित आहे, हे लक्षात घेऊन यथास्थिती राखणे महत्त्वाचे आहे. दोन्ही समुदाय वरील अटींमध्ये धार्मिक पूजा करू शकतात,'' याप्रकरणी मुस्लिम पक्षांनी दाखल केलेल्या अपीलावर न्यायालयाने हिंदू पक्षांनाही नोटीस बजावली आहे. जुलैमध्ये हे प्रकरण विचारासाठी सूचीबद्ध केले आहे.

उत्सुकता संपली; ज्योती मेटे यांचे नाव कोणत्याही क्षणी जाहिर होणार?

पंकजा मुंडे यांना टक्कर देण्यासाठी शिवसंग्रामचे मावळे मुंबईत तळ ठोकून

बीड । प्रतिनिधी

महाविकास आघाडीचा बीडसाठी उमेदवार कोण असेल याबाबत गेल्या दोन महिन्यांपासून वेगवेगळ्या नावांवर चर्चा रंगू लागल्या आहेत. सध्या ज्योती मेटे यांचे नाव आघाडीवर असून शिवसंग्रामचे मावळे पंकजा मुंडे यांना टक्कर देण्यासाठी मुंबईत तळ ठोकून आहेत. ज्योती मेटे या शरद पवार यांची भेट घेणार असून कोणत्याही क्षणी मेटे यांची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

बीड लोकसभा निवडणुक चुरशीची होईल, असे सध्या चित्र असून भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी प्रचाराचा धुमधडाका लावला आहे. त्या सध्या मोठ्या नेत्यांच्या भेटीगाठी घेत असून धार्मिक कार्यक्रमांनाही हजेरी लावत आहेत. त्यामुळे आपण प्रचारात आघाडीवर असल्याचे त्या सांगत आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीचा उमेदवार ठरला नसल्याने निवडणुकीतील लढाईची दिशा काय असेल हे अद्याप स्पष्ट झाले नाही. ज्योती मेटे, बजरंग सोनवणे यांची नावे सध्या ◀◀ पान २ वर

कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह

शिवसंग्राम व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये सध्या कमालीचा उत्साह पहायला मिळत आहे. ज्योती मेटे याच महाविकास आघाडीने उमेदवार म्हणून जाहीर कराव्यात, अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

रुग्णवाहिकामध्ये साडेसहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा

रोहित पवारांचा आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते तथा आमदार रोहित पवार यांनी राज्यातील आदिवासी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या दूध भोजनात भ्रष्टाचार केल्याच्या आरोपानंतर आता सरकारमधील मंत्र्यांनी रुग्णवाहिकामध्ये भ्रष्टाचार केल्याचे म्हटले आहे. आरोग्य विभागाने रुग्णवाहिका पुरवठा करणाऱ्या सुमित व बीव्हीजी या कंपनीला नियमबाह्य पद्धतीने टेंडर देण्यात आल्याचा आरोप रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला.

रोहित पवार म्हणाले की, आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी साडेसहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे, असा

गौप्यस्फोटही आमदार रोहित पवार यांनी आज केला. निवडणुकीला फंड देण्यासाठी बीव्हीजी आणि सुमित कंपनी यांच्यावर मेहरबानी दाखवली जात आहे. हा लढा सामान्य व्यक्तीचा असून नियम कसे वळविण्यात आले, टेंडर डिझाईन करून वळवले गेले असेही यावेळी सांगितले. रोहित पवार म्हणाले की, या भ्रष्टाचाराबाबत आमच्याकडे सर्व पुरावे आहेत. त्यामध्ये आरोग्य विभागातील मोठ्या ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०१ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू : ४५.५० क्विंटल		
किमान	कमाल	सरासरी
२,१५८	३,२२०	२,८५६
ज्वारी/हायब्रिड :२१६.०० क्विंटल		
१,८८१	३,३९०	२,५९५
मूग :०.५० क्विंटल		
९,२०१	९,२०१	९,२०१
तूर : १५.५० क्विंटल		
८,०००	९,६८६	८,९८९
उडीद : २.०० क्विंटल		
७,३००	९,६०१	८,९७५
बाजरीः १०.०० क्विंटल		
२,५९०	२,७२१	२,६५५
चिंचोका/लोकलः ४.०० क्विंटल		
१,९००	१,९००	१,९००
सोयाबीनः ५४.५० क्विंटल		
४,४११	४,५२०	४,४३७
हरभराः ३.०० क्विंटल		
५,३२५	५,५००	५,४१२

काळजी घ्या..! पुढील तीन महिने उन्हाच्या तीव्र झळा

हवामान विभागाचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

देशभरात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. अशातच सोमवारी (दि. १) भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहापात्रा यांनी एप्रिल ते जून या काळात मैदानी भागांमध्ये सामान्यापेक्षा जास्त उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. एप्रिल ते जून महिन्यांमध्येच देशभरात लोकसभा निवडणुका सात टप्प्यात होणार आहेत. या काळात देशातील बहुतेक भागांमध्ये कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची

शक्यता आहे, असे भारतीय हवमान विभागाने आपल्या 'प्रसिद्धी पत्रकात' नमूद केले आहे.

हवामान खात्याने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, ''एप्रिल ते जून दरम्यान देशातील अनेक भागात तीव्र उष्णतेची शक्यता आहे. या दरम्यान उष्णतेची लाट सुमारे १० ते २० दिवस राहण्याची शक्यता आहे. पश्चिम हिमालयीन प्रदेश, ईशान्येकडील राज्ये आणि उत्तर ओडिशाच्या काही भागातही तापमानात बदल दिसू शकतो. तसेच एप्रिल ते जून या कालावधीत गुजरात, मध्य महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, राजस्थान, मध्यप्रदेश, ओडिशा, उत्तर छत्तीसगड, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम दिसून येईल.'' नेहमीच एक ते तीन दिवस राहणारी उष्णतेची लाट तुलनेत दोन ते आठ दिवस राहण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहापात्रा यांनी म्हटले आहे.

देशातील अनेक भागात तीव्र उष्मा असेल

हवामान विभागाच्या मते, एप्रिल आणि जून महिन्यांत पश्चिम हिमालयीन प्रदेश, ईशान्य राज्ये आणि उत्तर ओडिशाच्या काही भागात कमाल तापमान सामान्य ते सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. त्याच वेळी, एप्रिलमध्ये देशातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, मध्य दक्षिण भारतात ही शक्यता अधिक आहे.

केजरीवाल १४ दिवसांसाठी तिहार जेलमध्ये

नवी दिल्ली । वृतसंस्था

आम आदमी पक्षाच्या (आप) अडचणी थांबण्याचे नाव नाही. आपचे संयोजक तथा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सोमवारी १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तत्पूर्वी, आपचे तीन मोठे नेतेही तिहार कारागृहात आहेत. सीएम केजरीवाल यांना जामीन मिळाला नाही तर, त्यांनाही पुढील १४ दिवसांसाठी तिहार कारागृहातच रहावे लागणार आहे.

ईडीने त्यांना २१ मार्चला अटक केली होती. अटक झाल्यापासून ते ईडीच्या कोठडीत होते. आता, केजरीवाल यांना तिहार कारागृह क्रमांक दोनमध्ये एकटे राहावे लागणार आहे. या कालावधीत त्यांना नाश्त्यात चहा आणि ब्रेड दिला जाईल. तसेच जेवणात पाच पोळ्या (चपात्या) दिल्या जातील. केजरीवालांना न्यायालयात जायचे असेल तर, परवानगी दिली जाईल. या काळात ते आपल्या कायदे विषयक टीम सोबत चर्चाही करू शकतील. तिहारमध्ये त्यांना सकाळी १०:३० ते ११ दरम्यान भोजन मिळेल.

अग्रलेख

संवेदना बोथट झाल्यात...

सध्या देशात लोकसभा निवडणुकीचा ज्वर चढलेला आहे. अगदी गल्लीबोळातल्या राजकीय बातम्यांवर व घडामोडींवरही जोरदार व गरमागरम चर्चा घडतायत. 'विकते तेच पिकते' या बाजारपेठेच्या तत्त्वानुसार माध्यमांमध्ये राजकीय बातम्या व घडामोडींचा महापूर आहे. अभिव्यक्तीचे व्यासपीठ बनलेल्या समाज माध्यमांचाही त्याला अपवाद नाही हे विशेष! मात्र लडाखचे, तेथील पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, स्थानिकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न सरकारच्या कानावर घालण्यासाठी सोनम वांगचूक यांनी गोठवणाऱ्या थंडीत मीठ आणि पाणी घेऊन २१ दिवस उपोषण केले, त्यांच्या आंदोलनास स्थानिक जनतेने भरभरून प्रतिसाद दिला तरी इतरवेळी काश्मीर म्हटले की, लगेच कान टवकारणाऱ्या आपल्या देशातील जनतेने, माध्यमांनी आणि स्वत:ला पंडित म्हणवून घेणाऱ्या समाजमाध्यमी वळवळ्यांनी कुठेच उपोषणाची दखल घेतली नाही. इलेक्शन मोडवर गेलेल्या सरकारकडून तर या काळात संवेदनशीलतेची अपेक्षाच फोल. मात्र, सरकारला येनकेन प्रकारे कोंडीत पकडण्यासाठी सतत मुद्यांच्या शोधात असणाऱ्या विरोधी पक्षांनीही या उपोषणाची व मागण्यांची दखल घेतली नाही हे विशेष. यावरून या प्रदेशाबाबतची उर्वरित देशाच्या मनातील व वर्तनातील अस्पृश्यता जशी स्पष्ट होते.

समाज म्हणून आपण किती दांभिक व निगरगट्ट बनलो आहोत याचे प्रत्यक्ष दर्शन घडते. सोनम वांगचूक यांनी ज्या मागण्यांसाठी उपोषण केले त्या लडाखवासीयांच्या मागण्या असे वरवर वाटत असले तरी प्रत्यक्षात ते संपूर्ण देशाचे प्रश्न आहेत. त्यावर गांभीर्याने वेळीच उपाययोजना केली गेली नाही तर उद्या संपूर्ण देशच त्यामुळे संकटात सापडणार आहे. मात्र, छोट्या-छोट्या विषयांवर वितंडवाद घालणारे आपण समाज म्हणून मूळ प्रश्नांवर व संकटावर केवळ अज्ञानीच नव्हे तर निगरगट्ट कसे? असाच प्रश्न या घटनाक्रमाने उपस्थित केला आहे. लडाख हे अस्थिर हिमालयातील समुद्रसपाटीपासून १२ ते १८ हजार फूट उंचीवरचे शुष्क वाळवंट. इथल्या पाण्याचा मुख्य स्रोत हा हिमनद्या. अनेक दुर्मिळ प्रजातींचा हा अधिवास आहे. तसेच वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असलेल्या अनेक जमातींचे हे वसतिस्थानही आहे. अशा लडाखच्या एकूण लोकसंख्येपैकी ९० टक्के रहिवासी अनुसूचित जमातींचे आहेत. त्यामुळे आता ३७० कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरपासून वेगळे झालेल्या या प्रदेशाला घटनात्मक तरतूद असलेल्या सहाव्या परिशिष्टात समाविष्ट करावे व आदिवासींचे संरक्षण करावे, ही येथील रहिवाशांची मागणी आहे. सध्या लडाखचे प्रशासन 'लडाख ॲटोनॉमस हिल डेव्हलपमेंट काऊन्सिल' आणि कारगिल ॲटोनॉमस हिल डेव्हलपमेंट काऊन्सिलच्या अखत्यारित आहे. या संस्थांना शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रांप्रमाणेच जमिनीचे व्यवहार व कर आकारणीचेही अधिकार आहेत. लडाखच्या सहाव्या परिशिष्टात समावेश न झाल्यास हे सर्व हक्क केंद्र सरकारच्या हाती जातील आणि हिमालयातील अन्य राज्यांप्रमाणेच लडाखमध्येही विकासाच्या नावावर मोठे औद्योगीकरण सुरू होईल, पर्यावरणास प्रचंड नुकसान पोहोचवले जाईल, याची भीती स्थानिकांना आहे. आणि हे रोखण्यासाठीच स्थानिक जनता रस्त्यावर उतरते आहे. विशेष म्हणजे लडाखची स्थानिक जनता त्यांचे जे प्रश्न मांडते आहे ते केवळ लडाखपुरते मर्यादित नाहीत. तेथील पर्यावरणीय बदलांचा देशाच्या पर्यावरणावरही मोठा परिणाम होणार आहे. या भागातील हिमनद्या देशाच्या इतर भागाला समृद्ध करणाऱ्या आहेत. त्यांना हानी पोहोचल्यास त्याचे दुष्परिणाम उत्तर भारताला भोगावे लागणार हे उघड आहे. शिवाय राजकीय व देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही लडाख हा भारतासाठी अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. चीनला खेटून असणाऱ्या या प्रदेशातील असंतोष भारताला परवडणारा नाहीच. आजवर या भागात शांतता होती.

वांगचूक यांनी गोठवणाऱ्या थंडीत २१ दिवस उपोषण करून लडाखवासीयांच्या प्रश्नाकडे देशातल्या व जगातल्या जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न अत्यंत कळकळीने केला. ज्या वांगचूक यांच्या व्यक्तिमत्त्वावर आधारित 'थ्री इडियट' चित्रपटातील फुंठसूक बांगडूच्या आमिर खानने साकारलेल्या भूमिकेला देशातील जनता डोक्यावर घेऊन नाचते त्या प्रत्यक्षातील समाजनायकाच्या टाहोशी मात्र समाजाला काहीच देणेघेणे नसते ही बाब अत्यंत विषण्ण करणारीच आहे.

लडाख व तेथील जनता भारतीय समाजाचा भाग आहे की नाही? असा प्रश्नच हे औदासीन्य निर्माण करते.

जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री.बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ -२००३ इयत्ता दहावी बॅचचा स्नेहमिलन सोहळा रविवार दि.३१ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि उद्घाटक श्री.बालाजी शिक्षण प्रसारक मंडळा चे संस्थापक सचिव राजकिशोरजी मोदी , कार्यक्रमाचे अध्यक्ष जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य.सी. व्ही.गायकवाड , विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक विनायक मुंजे ,राजेश कांबळे, बालाजी अंबाड , सौ.वर्षा गुळवे मॅडम , बालासाहेब इंगळे हे उपस्थित होते.

माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळ्याची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व मान्यवराच्या हस्ते करून करण्यात आली. यानंतर विद्यालयाच्या अतिथी देवो भव प्रमाणे आलेल्या सर्व शैक्षणिक वर्ष २००२-०३ बॅचच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात शिनगारे सर यांनी स्वागत गीत देखील गायले. नंतर या कार्यक्रमाचे सूत्र श्रीमती रेश्मा शेख यांच्याकडे सोपवण्यात आली. श्रीमती रेश्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना आलेल्या माजी विद्यार्थ्यांची ओळख करून दिली. मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि शाळेत कार्यरत सर्व शिक्षक, प्राध्यापक यांनी पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यानंतर शैक्षणिक वर्ष २००२- ०३ बॅचमधील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय देत आज आपण करत असलेल्या कार्याविषयी तसेच शाळेविषयी ,त्यावेळेस त्यांना शिकवत असलेल्या शिक्षकांबद्दल

त्यांनी आपल्या भावना व विचार व्यक्त करतांना आपल्या शाळेविषयाच्या जुन्या आठवणी ताज्या केल्या. या स्नेह मिलन कार्यक्रमाचे मुख्य अतिथी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी आपले विचार मांडताना जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाची स्थापना का केली यावर प्रकाश टाकला. या शाळेची उभारणी करताना गवळीपुरा , गुरुवार पेठ ,गांधीनगर, सिद्धार्थ नगर आणि आजूबाजूला असणाऱ्या परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सुरुवातीपासूनच गायकवाड सर ,कांबळे सर, मुंजे सर ,अंबाड सर, गुळवे मॅडम यांनी प्रयत्न केलेअसल्याचे मोदी यांनी सांगितले. संस्थेत शिक्षक म्हणून काम करत असताना सर्वांनी आई-वडिलांसारखे प्रयत्न केले आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन या गुरुजनांनी आपल्यासारखी एक सक्षम पिढी निर्माण केली अशी भावनादेखील राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केली. यानंतर विनायक मुंजे, कांबळे सर सौ.गुळवे मॅडम ,सौ.अकोलकर मॅडम यांनी आपल्या त्यावेळेस च्या आठवणी विद्यार्थ्यासोबत घालवलेला वेळ आणि विविध अडचणीतून विद्यार्थ्यांना शिकविणे ,शाळेचा वाढलेला विस्तार याबद्दल आपले विचार मांडले. सर्व शिक्षकांनी आपल्या या विद्यार्थ्यांच्या पुढच्या भविष्यासाठी तसेच त्यांच्या पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. शेवटी या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य सी.व्ही गायकवाड यांनीही शाळा उभारण्यापासून ते आजपर्यंत या माझ्या सर्व शिक्षकांनी अहोरात्र प्रयत्न केले आणि आहे त्या परिस्थितीमध्ये विद्यार्जनचे काम केले आणि एक सक्षम पिढी निर्माण करण्याचे काम केले त्यामुळे मला या सर्व शिक्षकांचा आणि आपल्यासारख्या विद्यार्थ्यांचा अभिमान असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी शैक्षणिक वर्ष २००२-२००३ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून शाळेला पन्नास इंची स्मार्ट टीव्ही सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भेट देण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थी आणि शिक्षक खूप आनंदी होते.माजी विद्यार्थी स्नेह मिलन सोहळा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

मुकुंदा आंधळे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता एम.आर. लाड हे नियत वयोमानानुसार ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले असून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंतापदी उपअभियंता मुकुंद आंधळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी युक्ती मार्च २०२४ रोजी मुकुंद आंधळे यांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले मुकुंद आंधळे हे नुकतेच बीड जिल्हा परिषद्च्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागात उप अभियंता म्हणून रुजू झाले आहेत. आंधळे यांच्याकडे पदभार देण्यात आल्यामुळे एका तरुण आणि कार्यतत्पर अधिकाऱ्याला जल जीवन सारख्या बहुचर्चित योजनेचे काम पाहण्याची संधी मुख्य कार्यकारी अधिकारी पाठक यांनी दिली आहे.

दुष्काळाच्या अनुषंगाने उद्या आढावा बैठक

बीड। प्रतिनिधी

इकबाल सिंह चहल, अतिरिक्त मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री कार्यालय यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक ०३ एप्रिल रोजी दुपारी १२.०० वाजता दुष्काळाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात येणार असून या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. यावेळी जिल्हानिहाय धरण पाणीसाठा सध्यस्थिती तसेच धरण साठ्यातील पाणी आरक्षणाबाबत सदयस्थिती, टॅंकर, विहिर व बोअर अधिग्रहण बाबत सदयस्थिती, टॅंकर भरण्यासाठी फिलींग पॉईंट, नगर पालिका, महानगर पालिका पाणी पुरवठा सदयस्थिती,भूजल पाणी पातळी सदयस्थिती, टंचाई कृती आराखडा अंमलबजावणी, एकूण पशुधन व चारा उपलब्धते बाबत सदयस्थिती, नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ अनुदान वाटपाची सदयस्थिती. या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तसेच सर्व विभागातील विभाग प्रमुख आणि सर्व तालुक्यातील तहसीलदार यावेळी ऑनलाइन उपस्थित होते.

मोदी सरकारकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना 'अस्पृश्यते'ची वागणूक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सन २०१४ साली भाजपने निवडणूक जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देवून आधारभूत किमती देण्यात येतील, जगभरातील सर्व सुधारित तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाईल. तसेच शेतीमालावर निर्यातबंदी लादली जाणार नाही. असे आश्वासन दिले होते. मागील दहा वर्षात शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या योजना आणि कांग्रेसी जुलमी कायद्याची अंमलबजावणी पाहता मोदी सरकारकडून शेतकऱ्यांना अस्पृश्यतेची वागणूक मिळाली आहे.असे प्रतिपादन सन २०१४, सन २०१९ सालातील बीड लोकसभेचे उमेदवार शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्याविषयी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे तत्कालीन न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड आणि क्षितिज व्यास यांनी ५ मे २००५ रोजी निकाल दिल्यानंतर कांग्रेसी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी कृषीतज्ञ डॉ.स्वामीनाथन यांच्या एक सदस्यीय आयोगाची स्थापना केली. डॉ स्वामीनाथन यांनी शेतकरी आत्महत्यांचा कलंक पुसण्यासाठी शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देण्याची शिफारस केली.मात्र कॉंग्रेस सरकारने सन २०१४ सालापर्यंत ही शिफारस लागू केली नाही. भाजपाने सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देऊन आधारभूत किमती () देण्याचे आश्वासन दिले. यामुळे देशभरातील शेतकऱ्यांनी भाजपला सत्तेत बसविले.दरम्यान भारतीय किसान संघ-परिसंघ (सिफा) या शेतकऱ्यांच्या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात ३७६/११ क्रमांकाची याचिका दाखल केलेली होती. नरेंद्र मोदी सरकारने सत्तेत येताच ६ फेब्रुवारी २०१५ रोजी शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा देणार नाही. असे धक्कादायक शपथपत्र दाखल केले. सन २०१४ साली निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनापासून नरेंद्र मोदी सरकारने फारकत घेतली. यामुळे देशभर शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये मोठी वाढ झाली. आजमितीला देशात सुमारे पाच लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपविले आहे. सप्टेंबर २०२१पासून शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी नरेंद्र मोदी सरकारने विशेष मोहीम हाती घेतली. सुरुवातीला व्यापाऱ्यावर शेतीमाल साठवणुकीसाठी मर्यादा घातली. लगेचच वायदे बाजारामधून शेतीमाल काढून टाकला. त्या पाठोपाठ खाद्यतेल,डाळींची बेसुमार आयात सुरू केली. एवढ्यावरच मोदी सरकार थांबले नाही तर त्यांनी सर्व शेतीमालावर निर्यातबंदी केली.सध्या कांदा,साखर,कापूस, सोयाबीन,मोहरी,गहू, तांदूळ,ज्वारी,बाजरी,मका,अन्नधान्य, दुध,भाजीपाला यांसह शेतीमालावर निर्यातबंदी केलेली आहे.यामुळे ११ हजार रुपये प्रति क्विंटल विकणारे सोयाबीन ४ हजार रुपयांने विकावे लागत आहे.१४ हजार रुपये प्रतिक्विंटल विकणारा कापूस ७ हजाराने विकावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेने भारतातील दुधाचे दररोजचे संकलन १४ कोटी लिटर असताना दुधाचा वापर मात्र सुमारे ६४ कोटी लिटर असल्याचे नमूद केले आहे.दररोज सुमारे ५० कोटी लिटर नकली दूध वापरणाऱ्या देशाचे भवितव्य काय असेल?

किसान सन्मान की,अस्पृश्यतेची वागणूक.

पेट्रोल,डिझेल,गॅस,सोने, लोखंड,औषधोपचार, कपडे ,शालेय साहित्य, रासायनिक खते,बियाणे, किटकनाशकांची दरवाढ होत असताना शेतीमालाच्या किमती जाणीवपूर्वक पाडल्या जात आहेत.परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत नरेंद्र मोदी सरकारने अंध,अपंग,दिव्यांग, विधवा, परितक्त्या, निराधाराप्रमाणे शेतकऱ्यांना दरमहा ५००/- रुपये सहाय्य करणारी योजना सुरू केली आहे.बाजारात शेतकऱ्यांना शेतीमालाला रास्त भाव मिळत नसल्याने राष्ट्रीयीकृत, ग्रामीण, खाजगी, सहकारी बँकांतील शेतकऱ्यांची ऐपत संपली आहे. देशातील ८० कोटी जनतेला रेशन दुकानातून धान्य पुरवठा करावा लागत आहे.तथाकथित पूरोगामी महाराष्ट्रात आनंदाचा शिधा वाटप करुन भूक भागविली जाते.एकेकाळी दलित आदिवासी समाजातील लोकांना पंगतीत जेवायला बसवित नव्हते.तशीच अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे.सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करावा असे आवाहन कालिदास आपेट यांनी केले आहे.

वीज दरवाढीचा शॉक

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारने रेडीरेकनरच्या दरात कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा दिला. मात्र, दुसरीकडे महावितरणने वीजदरवाढीचा ग्राहकांना झटका दिला. १ एप्रिलपासून वीजबिलात सरासरी ७.५० टक्क्यांची वाढ होणार असून, स्थिर आकारातही १० टक्के दरवाढ होणार आहे. राज्य वीज नियामक आयोगाने गेल्या वर्षी दिलेल्या आदेशानुसार महावितरणकडून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे.

गतवर्षी महावितरणने सादर केलेली वीजदरवाढीची याचिका राज्य वीज नियामक आयोगाने मंजूर केली. त्यानुसार वीजदरात सरासरी २१.६५ टक्क्यांची वाढ झाल्याचा दावा वीजग्राहकांच्या संघटनांनी केला होता. त्यापैकी गेल्या आर्थिक वर्षात (२०२३-२४) वीजबिलात सरासरी ७.२५ टक्के, तर या आर्थिक वर्षात (२०२४-२५) वीजबिलात ७.५० टक्के अशी एकूण सरासरी १४.७५ टक्के वाढ झाली आहे. स्थिर आकारातही गेल्या वर्षी १० आणि या वर्षी १० टक्के अशी २० टक्के वाढ झाली आहे. घरगुतीसह व्यापारी, शेतकरी, उद्योग अशा सर्वच वर्गवारींतील ग्राहकांना ही दरवाढ लागू होणार आहे. राज्यात उन्हाचा चटका वाढल्याने विजेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा काळातच वीजदर वाढीचा 'शॉक' ग्राहकांना बसणार आहे. देशातील अन्य राज्यांत विजेचे दर आपल्यापेक्षा खूप कमी आहेत. अनेक राज्यांत शंभर युनिटपर्यंत वीजबिल माफ केले जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात दर कमी करणे सोडाच. परंतु नियमित दरवाढ होत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शॉक बसला आहे.

पान १ वरून...

जायफळ टॅफी आविष्काराला

फार्म आणि गोवा राज्य जैवविविधता मंडळ, गोवा या संस्थांनी आधीच यशस्वी व्यापारी उत्पादन सुरू केले आहे. हे नव उत्पादन म्हणजे सामाजिक - आर्थिक विकासाच्या दृष्टीने कृषी नवोन्मेषांच्या संभाव्यतेचा उपयोग करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. गोव्यातील आयसीएआर-सीसीएआरआय च्या इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट युनिटने पेटंट अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच कृषी क्षेत्रातील नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी संस्थेची बांधिलकी दर्शवली आहे.

महायुतीचे शिलेदार पवारांच्या

मतांनी निवडून आल्या. आता त्यांच्या मोठ्या कन्या पंकजा मुंडे यांना भाजपची उमेदवारी आहे. मात्र यावेळी त्यांच्याऐवजी ज्योती मेटे या महाविकास आघाडीच्या उमेदवार राहिल्या तर त्यांना मतदारांची सहानुभुती मिळू शकते. तसेच राज्यात महायुती असल्याने खासदारांसह आता भाजपमधील आमदार आणि विधानसभेच्या संभाव्य उमेदवारांचीही धाकधुक वाढली आहे. लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा प्रयोग राज्यात होण्याची दाट शक्यता असून त्यामुळे आपली संधी हुकते की काय? असा विचार महायुतीच्या बीडमधील शिलेदारांना त्रस्त करीत असेल, असे बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकीतच अशा शिलेदारांकडून पंकजा मुंडे व महायुतीला धक्कातंत्र दिले जाण्याची शक्यता आहे. बजरंग सोनवणे याच विचाराने शरद पवार यांच्या सोबत गेले. त्यामुळे दुसरे जाण्याअगोदर आपणच जावे, यासाठी येणाऱ्या काही दिवसात महायुतीचे बीड जिल्ह्यातील बरेच शिलेदार शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करतील, असे म्हटले जात आहे. याची सुरुवात आष्टी, गेवराई आणि माजलगाव विधानसभा मतदारसंघातून होणार असल्याचे दिसते. लोकसभा निवडणुकीत जो कामी येईल त्याचा पवार विधानसभेसाठी विचार करु शकतात, असेही म्हटले जात आहे. तसे झाले तर पंकजा मुंडे यांच्यासमोर डोंगराऐवढी अडचण उभी राहू शकते. समोरुन ज्योती मेटे यांच्या सारखा तगडा उमेदवार आणि दुसरीकडे आपल्याच लोकांमुळे वाढत चाललेली डोकेदुखी, अशा दुहेरी संकटाचा सामना त्यांना करावा लागणार असल्याचे दिसते.

ईव्हीएम फिक्सिंगच्या

(हॅकिंग) शिवाय, सोशल मीडिया आणि प्रेसवर दबाव आणल्याशिवाय ते १८० चा टप्पाही पार करू शकणार नाहीत, असा आरोपही त्यांनी केला होता.

उत्सुकता संपली; ज्योती मेटे यांचे

आघाडीवर असून दोघांनीही आपल्यालाच उमेदवारी मिळावी म्हणून तगडी फिल्डिंग लावली जात आहे. उमेदवारीच्या स्पर्धेत ज्योती मेटे या आघाडीवर असून शिवसंग्रामचे मावळे सोमवारी मुंबईत दाखल झाले. मेटे या शरद पवारांची भेट घेऊन चर्चा करणार असून कोणत्याही क्षणी त्यांची उमेदवारी जाहीर केली जावू शकते, असे म्हटले जात आहे. मेटे निवडणुकीच्या आखाड्यात आल्या तर पंकजा मुंडे यांची डोकेदुखी वाढणार असून मराठा विरुध्द ओबीसी अशी लढाई बीड लोकसभा मतदार संघात पहायला मिळण्याची शक्यता आहे.

ज्ञानवापी तळघरात पूजा

आदेश दिला आहे.वाराणसी जिल्हा न्यायालयाने ३१ जानेवारी रोजी हिंदूंना ज्ञानवापी मशिदीच्या दक्षिणेकडील 'व्यास तहखाना'मध्ये पूजेची परवानगी दिली होती. या आदेशाला आव्हान देणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने फेटाळली होती. उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले होते की, १५५१ पासून या ठिकाणी हिंदू प्रार्थना केल्या जात असल्याचे दर्शविणारा भक्कम पुरावा आहे. १९९३ मध्ये तोंडी आदेशाद्वारे हिंदू प्रार्थना थांबवणे उत्तर प्रदेश सरकारकडून बेकायदेशीर आहे. असे स्पष्ट करत वाराणसी जिल्हा न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. वाराणसी जिल्हा न्यायालयाने ३१ जानेवारी २०२४ रोजी ज्ञानवापी मशिदीच्या दक्षिणेकडील तळघरात पुजाऱ्यांना पूजेला परवानगी दिली होती. १ फेब्रुवारीच्या मध्यरात्री मशिदीच्या आवारात धार्मिक विधी पार पडले.नंतर दक्षिणेकडील तळ भक्तांसाठी खुले करण्यात आले होते. वाराणसी जिल्हा न्यायालयाच्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयाने याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळात उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी, असे स्पष्ट केले होते. अंजुमन इंतेजामिया मस्जिद समितीच्या वतीने अलाहाबाद उच्च न्यायालयाने याचिका दाखल केली होती. ती न्यायालयाने फेटाळल्यानंतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

रुग्णवाहिकामध्ये साडेसहा हजार

लोकांनी साडे सहा हजार कोटीचा घोटाळा केला आहे. या पैशाचा वापर निवडणुकीसाठी करण्याचा प्रयत्न आहे. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी हा घोटाळा केला असून राज्याला भिखारी केले आहे. सरकारने त्यांची सखोल चौकशी करावी, आणि सावंत यांनी राजीनामा द्यावा अशी मागणीही यावेळी केली. रोहित पवार म्हणाले की, स्वच्छता कामाचे टेंडर अचानक मोठ्या प्रमाणात वाढवले गेले. राज्यात अत्यावश्यक सेवेसाठी स्पॅनिश कंपनी यांना टेंडर दिले गेले होते. त्यांच्या सोबत करार करण्यात आला. टेंडर हे सुमित कंपनी यांनी डिझाईन केले आणि त्यांनाच मिळाले. त्यांना स्वच्छतेच्या कामाचा अनुभव नसताना ही नियमबाह्य पद्धतीने त्यांना रुग्णवाहिका सेवा पुरवण्याचे कंत्राट दिले गेले. तेव्हा, त्यांच्याविरुद्ध तक्रार करणाऱ्या बीव्हीजी कंपनीला ही नाराज न करता त्यांना देखील टेंडरमध्ये सामावून घेण्यात आले आहे. पिंपरी चिंचवडमधील अमित साळुंखे नावाच्या व्यक्तीची सुमित कंपनी आहे. या प्रकरणात साडे सह हजार कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. हाच पैसा निवडणूक निधी म्हणून देण्यात आला आहे. सावंत यांना मी पाच दिवसाचा वेळ देतो त्यांनी आपली बाजू मांडावी. आरोग्य विभागाचा हा खेकडा पोखरत असून पारदर्शक प्रक्रिया राबवावी असे आवाहनही यावेळी केले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

तारूगव्हाण (पोहनेर) बंधाऱ्यामध्ये पिण्यासाठी ३.५४ द.ल.घ.मी. पाणी सोडण्यास शासनाची परवानगी – आ. प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव प्रकल्पाच्या मृतसाठ्यातुन उजव्या कालव्याद्वारे गोदावरी नदीवरील तारूगव्हाण (पोहनेर) उच्च पातळी बंधा-यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी पाणी सोडण्यात यावे अशी खतगव्हाण,डिग्रस, पिंपरी खु.,मोगरा, शुक्लतिर्थ लिमगाव,गुंजथडी या गावांची मागणी होती.माजलगाव प्रकल्पामध्ये जिवंत पाणीसाठा उपलब्ध नसल्यामुळे मृत साठ्यातुन पाणी सोडण्यासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने गोदावरी महामंडळ मार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. शासनाची परवानगी मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री (जलसंपदा) देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या आदेशाने शासनाने दि. ०१ एप्रिल सोमवार रोजीच्या पत्रान्वये आज दि ०२ एप्रिल मंगळवार रोजी माजलगाव धरण्याच्या उजव्या कालव्यातून ३.५४ द.ल.घ.मी.पाणी सोडण्यास परवानगी दिली आहे.अशी माहिती आ.प्रकाश सोळंके यांनी प्रसिद्धीपत्रका द्वारे दिली आहे.

रेल्वेच्या चार विभागाशी जोडले जाणार परळी रेल्वेस्थानक

परळी । अनुप कुसुमकर

बीड जिल्ह्यातील रेल्वे दळणवळणासाठी महत्त्वाचे प्रमुख रेल्वे स्थानक असलेले परळी वैजनाथ येथील रेल्वे स्थानक आता रेल्वे विभागाच्या चार विभागीय कार्यालयाशी जोडले जाणार आहे. यापूर्वी दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद, दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड, मध्य रेल्वेच्या सोलापूर या तीन विभागाशी जोडलेले परळी रेल्वे स्थानक आता परळी-बीड-नगर रेल्वे मार्ग अस्तित्वात आल्यावर पुणे विभागाशी देखील जोडले जाणार आहेत. चार विभागाशी जोडले जाणारे एकमेव रेल्वे स्थानक परळी हे असणार असून त्या दृष्टीने अत्यावश्यक सुविधा रेल्वेस्थानकावर वाढविणे गरजेचे आहे.

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या नगरीला निजाम काळापासून रेल्वे मार्गाने जोडण्यात आलेले आहे. ९० च्या दशकापर्यंत परळी ते परभणी मीटर गेज व परळी ते हैदराबाद ब्रॉडगेज रेल्वे मार्गाने जोडण्यात आला होता कालांतराने परळी ते परभणी हा देखील ब्रॉडगेज मार्ग बनवण्यात आला काळ बदलला तसे सुविधाही बदलण्यात आले असून परळी रेल्वे मार्गावरून रेल्वे स्थानकावरून धावणाऱ्या सर्वच गाड्या आता विद्युत इंजिन घेऊन धावत आहेत. परळी ते परभणी पुढे नांदेड,औरंगाबाद हा रेल्वे मार्ग दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात येतो, परळी ते विकाराबाद हा रेल्वे मार्ग दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद कार्यालयाशी संबंधित आहे तर परळी-लातूर-उस्मानाबाद हा रेल्वे मार्ग रेल्वेच्या सोलापूर विभागाशी संबंधित आहे नव्याने निर्मानाधीन परळी बीड नगर हा रेल्वे मार्ग पुणे विभागाच्या अतिरिक्त असल्याने परळी रेल्वे स्थानक आता रेल्वेच्या चार विभागाशी जोडले जाणार आहे.

पिट लाईनसह इतर बाबींची आवश्यकता

परळी रेल्वे स्थानकाकडून रेल्वेच्या विद्यमान परिस्थितीत तीन विभागात गाड्या धावतात परळी बीड नगर रेल्वे अस्तित्वात आल्यानंतर पुणे विभागातील परळी रेल्वे स्थानकाचा संपर्क वाढणार आहे या अनुषंगाने परळी रेल्वे स्थानकावर रेल्वे बुकिंग ची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी फिटलाइनची गरज असून यासोबतच नियमितपणे प्रवासी बोगींची स्वच्छता करण्यासाठी स्वच्छताकर्मी आदींची गरज भासणार आहे.

अटल भारत योजनेत समावेश

रेल्वे मंत्रालयाकडून रेल्वे स्थानकाचा कायापालट करणाऱ्या अटल भारत योजनेत परळी रेल्वे स्थानकाचा समावेश केला असून या योजनेअंतर्गत रेल्वे स्थानकावर विविध विकास कामे वेगाने सुरू आहेत तसेच एक स्टेशन एक उत्पादन योजना अंतर्गत रेल्वे मंत्रालयाने स्थानिक/स्वदेशी उत्पादनांना प्राधान्य देण्यासाठी देखील परळी रेल्वे स्थानकाची निवड केलेली असून स्थानकावर स्थानिक उत्पादनांना विक्री करून देण्यासाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

अशोक खरसाडे यांच्याकडून इफ्तार पार्टीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३१ मार्च रविवार रोजी सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे अशोक खरसाडे यांच्याकडून आहेर वडगाव मज्जिद मध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सविस्तर वृत्त असे की या महिन्यामध्ये पवित्र रमजान चा उपवास मुस्लिम बांधवांना असतो. या उपवासाचे वैज्ञानिक कारण देखील अशोक खरसाडे यांनी सांगून सर्व मुस्लिम बांधवांना सामाजिक एकता,बंधुत्व आणि आनंद भाईचारा या सर्व गोष्टीवर विश्लेषण करत पवित्र रमजानच्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या .कार्यक्रम मोठ्या उत्साहात कार्यक्रम साजरा झाल्याचा आनंद देखिल खरसाडे यांनी बोलून दाखवला. यावेळी कोल्हारवाडी,आहेर वडगाव ,पाली तसेच बीड शहरातून आवर्जून उपस्थित माजी पोलीस निरीक्षक नवनाथ ढोले,पंचायत समिती सदस्य गुंडीबा नवले, रावसाहेब पाटील, भास्कर पिंपरीकर प्रशिक्षक, बाबासाहेब रांजवण सर .बंडू रोहिटे सिताराम मुळे सहित गावातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँन्ड आयटीमध्ये जिल्हास्तरीय पोस्टर प्रेझेन्टेशन व प्रोग्रामिंग कोंटेस्ट ऑन 'सी' यशस्वीरित्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँन्ड आय टी, मोदी लर्निंग सेंटर रिंग रोड, अंबाजोगाई येथे जिल्हा स्तरीय पोस्टर प्रेझेन्टेशन व प्रोग्रामिंग कोंटेस्ट ऑन '''' चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. सुरेश बिराजदार होते.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेले प्रत्येक भित्तीपत्रक (पोस्टर) पाहत असताना त्यांच्याशी त्याविषयी उपस्थित मान्यवरांनी मनमोकळा संवाद साधला.त्यांनी साकारलेला विषय तथा भविष्यकालीन परीणाम या वर सांगोपांग चर्चा केली तथा त्यांच्या विविध अंगी गुणाचे कौतुक ही केले. श्री

बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाने जिल्हा स्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करुन संस्थेने मराठवाड्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोरजी मोदी तसेच कार्यकारी संचालक संकेत राजकिशोरजी मोदी, डॉ बी आय खडकभावी, प्रा.व्ही.बी.चव्हाण, डॉ. डी एच. थोरात यांचे अमुल्य प्रोत्साहन लाभल्याचे प्रा. सुरेश बिराजदार यांनी नमूद केले. जागतीक स्पर्धेत विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यासाठी, औद्योगिक गरजा पूर्ण करण्यासाठी महाविद्यालय सातत्याने विविध उपक्रम राबवित असते. त्यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन व प्रोग्राप्रिमिंग कॉन्टेस्ट या व इतर विषयावर विविध विषय तज्ञांचे मार्गदर्शन वेळोवेळी उपलब्ध करून दिल्या जात असते.

या कार्यक्रमात विविध स्पर्धासाठी परीक्षक म्हणुन थर्मल पॉवर स्टेशन, परळी वैजनाथ येथील विशाल विलास भिटे, प्रा. विनायक मुंजे व प्रोग्रामर विरेंद्र जाधव लाभले होते . कार्यक्रमास कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँन्ड आय टी विभाग मार्गदर्शक राघवेंद्र राजमान्य, रेंजो आरचंद्रन, डॉ. तरके, डॉ. फुलारी संयोजक डॉ. व्ही. एस. हमदे सहसंयोजक डॉ. परदेशी टी.जी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. पायल कदम तर आभार प्रदर्शन कु. निकीता काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

दहिफळेवस्ती शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा

मानूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिफळे वस्ती केंद्र मानूर तालुका शिरूर कासार जिल्हा बीड या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन अर्थात सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे नियोजनबद्द पद्धतीने पार पडला.यावेळी चेअरमन दिलीप जायभाये ,मानूर केंद्राचे केंद्रप्रमुख का.भा.खेडकर ,मधुकर सानप ,अनंत सानप ,जी. डी.मिसाळ , आर. डी.मिसाळ ,नामदेव जायभाये , लखुळ मुळे ,देशमुख ,संतोष भाबड ,शरद सानप ,दीपक देठे व इतर मान्यवर यांच्या उपस्थित उद्घाटन संपन्न झाले. शाळा स्तरावर विज्ञान प्रदर्शन व बाल आनंद मेळावा यामधील विजेत्या सर्व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.देवा श्री गणेशा ८ वी या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.मान्यवर व पालकांनी बक्षिसाची उधळण करत

बालकांच्या विविध कलागुणांनी पालक भारावले

विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.आम्ही शिवकन्या ६ वी मुलींनी सादर केलेल्या गीताने वीरश्री निर्माण केली.देशभक्ती लेझिम नृत्याने वाहवा मिळवली,तर तिसरी विद्यार्थ्यांनी यामधून अभ्यासाचा ताण घ्यायचा नाही हा सुंदर संदेश देत दाद मिळवली. झुंजू मुंजू पहाट झाली या गीताने कार्यक्रमाची शोभा वाढवत कमाल केली,दर्या किनारे,टिपरी नृत्य,नवराई माझी,ही मायभूमी,माय भवानी,काठी न घोंगडं घेऊ द्या या गीतानी अत्यंत सुंदर देखावे सादर केले.प्रणाली पालवे व ग्रुप ने आपली यारी, मैय्या यशोदा,खंडेराया झाली माझी दैना या गीतांनी धमाल केली.पायल शिरसाट व ग्रुप ने लिंबोनीच लिंबू,प्रेम रतन धन पायो, लावणी सादर करत कार्यक्रमात रंगत भरली. वेडा नाम्या या विनोदी नाटीकेनी पालकांना खळखळून हसवले. तर सातवी मुलांनी महिला व बालकांच्या शिक्षणाचा हक्क पथनाट्य सादर करत सामाजिक,शैक्षणिक व राष्ट्रीय संदेश देत जनजागृती केली.साक्षी कदम व सहकारी यांनी साऊथ इंडियन या गीतावर ताल धरताच कार्यक्रमातील सर्व पालकांनी टाळ्यांचा कडकडाट करून मुलांना प्रेरणा दिली.हे गीत कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.पहिली वर्गाने सादर केलेले आमच्या पप्पांनी गणपती आणला हे गीत वन्स मोअर ठरले.आई मला जावू दे,विठू रायाची नगरी,माऊली माऊली एकच राजा या गीतांनी धमाल केली. मेरे पापा मेरा संसार है या गीताने उपस्थितांची चक्षु पाणावले .संपूर्ण कार्यक्रमास सर्व पालकांची अप्रतिम दाद मिळाली. मुख्याध्यापक ताजुद्दिन शेख ,संतोष गर्जे ,अंकुश खेडकर ,दत्तू शिरसाट , शितल काळदाते मॅडम,कैलास तुपे , उमेश घोडके या सर्व शिक्षकांनी संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक ती सर्व मेहनत घेतली.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी तर आभार प्रदर्शन शेख सर यांनी व्यक्त केले.

डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्यासह बौद्ध विहारांना रंगरंगोटी करण्यास नकार

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी देशभरात साजरी केली जाते. बीड शहरात देखील १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले आहे. या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास रंगरंगोटी, विद्युत रोषणाई केली जाते.तसेच शहरातील दलित वस्तीमधील बौद्ध विहारांना व समाज मंदिरांना रंग दिला जातो. या कालावधीत दररोज स्थळाची साफसफाई केली जाते. या सर्व कामाबाबत दि.१२ मार्च रोजी निवेदन दिले होते. मात्र अद्याप काहीच कार्यवाही झालेली नाही.

आंबेडकरी जनता बीड नगर परिषद समोर करणार आंदोलन

बीड नगर परिषद मुख्याधिकरी यांची कार्यालयात भेट होत नाही. फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केल्यास उभा उडूची उत्तरे व आचारसंहितेचे कारण दाखवले जाते. त्यामुळे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान आहे. हा अवमान आंबेडकरी जनता सहन करणार नाहीत. या निषेधार्थ दि.४ एप्रिल सकाळी ११ वाजता बीड नगर परिषद आंबेडकरी जनतेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात आंबेडकरी जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यात १५ एप्रिल रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

मराठा ओबीसी,धनगर व इतर समाजाचे विविध उपोषण,आंदोलने,सभा सद्या सुरु असून जिल्हयात राजकीय हालचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने, रास्ता रोको या सारखे आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ८ एप्रिल २०२४ रोजी छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी, दि. ९ एप्रिल २०२४ रोजी गुढीपाडवा आणि दि ११ एप्रिल २०२४ रोजी रमजान ईद,दि. १४ एप्रिल २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती संपन्न होत त्यामुळे किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची शक्यता नाकारता येत नाही. कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १ एप्रिल २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १५ एप्रिल २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

कासारी (बोडखा) जि. प .शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड

धारूर । प्रतिनिधी

जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या नवोदय प्रवेश परीक्षेत कासारी (बोडखा) येथील जि.प.शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असून या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

धारूर तालुक्यातील देवदहिफळ केंद्रांतर्गत कासारी (बोडखा) या शाळेचे उत्कर्ष वसंत कुंभार व आर्यन मंगेश कांदे हे दोन विद्यार्थी नवोदय प्रवेश परीक्षेसाठी बसले होते .या परीक्षेत त्यांनी घवघवीत यश संपादन केले. या त्यांच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक किसन मस्के, शिक्षक श्रीराम सिकची, दिगंबर बिडवे ,वसंत कुंभार, नजिम सय्यद, अर्चना बागल, रागिणी बनसोडे, अशोक बडे ,गिन्यानदेव राठोड आदींनी अभिनंदन केले असून या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने उत्कर्ष कुंभार व आर्यन कांदे यांची नवोदय विद्यालय गढीसाठी निवड झाल्याचे या विद्यार्थ्यांचे पालक सांगतात. या त्यांच्या यशाबद्दल या दोन्ही विद्यार्थ्यांचे परिसरात अभिनंदन होत आहे.

आधुनिक काळात ग्रामीण भागातील पारंपरिक व्यवसाय धोक्यात

ज्योतिराम पाढरपोटे । माजलगाव

प्रगत तंत्रज्ञानामुळे आधुनिक साधनांचा बदलत्या जीवनशैलीत वापर वाढत आहे.यामुळे ग्रामीण भागातील पारंपरिक साधन मागे पडत असून सुतार, चांभार,कुंभार,लोहार या समाजाचा पारंपरिक व्यवसाय मोडकळीस आल्याचे चित्र ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे.

ग्रामीण भागातील पूर्वीच्या बलुतेदार पद्धतीवर अवकळा आल्याने कारागिरांसमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पूर्वीच्या काळी सुतार,चांभार, लोहार,कुंभार यांना शेतकऱ्यांच्या जीवनात विशेष स्थान होते.सुतार हा शेतीसाठी लागणारे वखर,नांगर,दरवाजे बनवून द्यायचे.आता हे साहित्य लोखंडी स्वरूपात मजबूत प्रकारात बाजारात मिळत असल्याने त्याचा परिणाम लोहार कारागिरांच्या व्यवसायावर होत आहे.तर पारंपरिक पद्धतीने कातड्यावर प्रक्रिया करुन पादत्राणे तयार केले

तंत्रज्ञानाचा प्रभाव;बदलत्या जीवनशैलीमुळे गरजाही बदलल्या

जायचे.पद्धतीनुसार चपला,जोडे बाजारात उपलब्ध झाल्याने चांभार या व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.कुंभार मातीला एकजीव करून माठ,सुरई, पणत्या,रांजण तयार करून आपला उदरनिर्वाह चालवित असे.आता या व्यवसायाला देखील उतरती कळा लागली असून या व्यवसायिकांना आता शासकीय मदतीची गरज आहे.बाजारपेठेत आधुनिक तंत्राचा व यांत्रिक पद्धतीने बनविलेल्या साधनांनी शिरकाव केल्याने या पारंपरिक व्यवसायिकांनी बनविलेल्या साहित्याला आता विशेष अशी मागणी राहिली नाही. जागतिकीकरणात ग्रामीण भागातही या वस्तू सहजरित्या उपलब्ध होत असल्याने या व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.ग्रामीण भागात तर कुंभाराचे चाक बंद होण्याच्या मार्गावर आहे.तप्त आगीत लोखंडाला आकार देऊन ग्रामस्थांना , कुऱ्हाड,विळा तयार करणाऱ्याया लोहार समाजावर आधुनिकतेमुळे व्यवसाय करण्याची वेळ आली आहे.या व्यावसायिकांना आता कामाच्या शोधात शहरात भटकंती करावी लागत आहे. त्यांना प्रशिक्षणातून तंत्रज्ञानाची ओळख करून दिल्यास व्यवसायाला संजीवनी मिळेल.

उदरिनर्वाहाचे साधन हरवले

ग्रामीण भागात वडिलोपार्जीत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांवर काल ओघात उपासमारीची वेळ आली आहे.या कारागिरांमधील कला जिवंत ठेवण्यासाठी शासनाने प्रभावीपणे उपाय योजना राबविण्याची मागणी होत आहे. व्यवसायाला नवसंजीवनी देण्यासाठी आवश्यक प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची गरज व्यक्त होत आहे. नामशेष होणाऱ्या या कारागिरांना आधुनिक तंत्रज्ञान अवगत करुन देत व्यवसायाला उभारी देण्याची मागणी होत आहे.

पान ६ वरून...

भारतरत्नचे राजकारण दुर्दैवी

पदाच्या सर्वोच्च पदावर बसवलं हेच खर्या अर्थाने काँग्रेसची पोटदुखी असल्याचे कुलकर्णी यांनी पुढे बोलताना म्हटले. खरे तर काँग्रेसनं प्रस्थापितांना नेहमीच साथ दिली. परिवारवाद हा त्यांच्या विचाराचा बाणा असुन भाजपाच्या राजकारणाची मुळ धारणा सामान्य माणुस आहे. त्यांना राष्ट्रपती पदावर बसवणं म्हणजे एका आदिवासी समाजाला देशाच्या राजकिय प्रवाहात, विकासाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठा मिळवुन देण्यासारखे होय. ज्यांनी सामान्य लोकांच्यासाठी पन्नास वर्षांत काही केलं नाही त्या काँग्रेसला अशा प्रकारचे आक्षेप घेण्याचा मुळीच नैतिक अधिकार नाही. महिलांच्या नावाने उदो - उदो करणार्या काँग्रेसवाल्यांनी महिला आरक्षणाचे घोंगडे इतक्या वर्षी भिजत का ठेवलं ? असा सवाल ही कुलकर्णी यांनी केला. हे मात्र नक्कीच आहे की, पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली होवू घातलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपा ४०० पार होणार आणि पुन्हा तिसर्यांदा पंतप्रधान पदावर नरेंद्रभाई मोदी विराजमान होणार हे त्रिवार सत्य असल्याने काँग्रेसवाल्यांची मानसिकता बिथरणे हे साहजिकच म्हणावे. परिणामी अशा प्रकारचे कुविचार त्यांच्या डोक्यातुन पुढे येतात आणि भारतरत्न सारख्या पुरस्कारावर ही ते राजकारण करतात. मात्र सामान्य जनतेला त्यांची निती पटत नसल्यानेच हा पक्ष रसातळाला जात असल्याचे भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

फुला-फळांची लाग़वड करा, सरकारकडून लाखो रुपयांचं अनुदान मिळवा

केंद्र सरकारसह विविध राज्यातील सरकारे शेतकऱ्यांसाठी अनेक योजना सुरु करत आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. बिहार सरकारनं अशीच एक योजना सुरु केलीय. या योजनेच्या माध्यमातून सरकार फुला-फळांच्या लागवडीसाठी लाखो रुपयांचे अनुदान देत आहे.

शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी निर्णय

बिहार सरकारनं फुले आणि फळांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी मोठा निर्णय घेतलाय. या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी सरकारनं फलोत्पादन समूह विकास योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना फुले आणि फळांच्या लागवडीसाठी एक लाख रुपयांचे

अनुदान देत आहे. त्यामुळं जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असं आवाहन सरकारच्या वतीनं करण्यात आलंय.

या फळांसाठी मिळणार अनुदान

फुले आणि फळांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारनं एकरी १ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतलाय. फलोत्पादन समूह विकास योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगला लाभ मिळणार आहे. दरम्यान, बिहार सरकारच्या कृषी विभागानं यासंदर्भातील सर्व माहिती दिलीय. या माहितीनुसार, पपई, पेरु, वेल, झेंडू, फूल, आवळा, ड्रॅगन फ्रूट, स्ट्रॉबेरी, लेमन ग्रास, विविध प्रकारची फळे आणि फुले यांच्या लागवडीसाठी बिहार सरकार अनुदान देत आहे. फलोत्पादन समूह विकास योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी एकत्र येऊन अर्ज करु शकतात. अर्ज करण्यासाठी अधिकृत वेबसाइट देण्यात आलीय. या साईटवर फलोत्पादन समूह विकास योजनेच्या संदर्भातील सर्व माहिती देण्यात आलीय.

उन्हाळ्यात फळझाडांची काळजी

सद्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. या दिवसांत झाडांना पाण्याची गरज असताना पाणी मिळत नाही. यामुळे शेतकरी वेगवेगळ्याप्रकारे पाणी देण्याचा आणि झाडांभोवती ओल टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

फळझाडामध्ये आच्छादनाचा वापर : आच्छादनाचा उपयोग केल्यास पावसाचा जमिनीवर पडण्याचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरले जाते. आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीची धूप कमी होते. आच्छादनामुळे जमिनीतील पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्त काळ टिकतो. तणांच्या वाढीस काही प्रमाणात आळा बसतो. जमिनीत योग्य तापमान राखण्यास मदत होते. जमिनीला भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते अथवा जमिनीस भेगा पडण्याचा कालावधी लांबतो.

आच्छादनाच्या वापराने दिलेल्या खतांचा जास्त कार्यक्षमतेने उपयोग करून घेता येतो. उन्हाळी हंगामात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालवधी वाढविता येतो. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनातही वाढ होते.

खतांची फवारणी करणे : उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांचे तापमान वाढते व पानातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया मंदावते.

अशा वेळी १ ते १.५ टक्के (१०० ते १५० ग्रॅम १० लिटर पाणी) पोटॅशियम नायट्रेट (३) आणि २ टक्के विद्राव्य डायअमोनियम फॉसपेट (२०० ग्रॅम १० लिटर पाणी) यांची २५-३० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया गतिमान होते व झाडे जमिनीतील ओलावा शोषण्यास सुरुवात करतात.

फळझाडांना बोर्डोपेस्ट लावणे : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते. अशावेळी झाडांचे बुरशीजन्य व इतर रोगांपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने खोडांना बोर्डोपेस्ट लावणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे १ ते २ मीटर उंची पर्यंत चुन्याची पेस्ट किंवा बोर्डो पेस्ट लावावी. बोर्डो पेस्ट लावण्याने सूर्यकिरण परावर्तीत होतात, खोडाचे तापमान कमी राहते, साल तडकत नाही.

बरसीम लागवड करा मिळवा आर्थिक फायदे

सध्याच्या घडीला डेअरी व्यवसाय ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी मोठा व्यवसाय म्हणून समोर आला आहे. पशुपालन करणारे शेतकरी बहुतांशी जातिवंत दुधाळ गायी आणि म्हशी पाळण्यास प्राधान्य देतात. डेअरी व्यवसायातून शेतकऱ्यांना बऱ्यापैकी आर्थिक फायदा देखील होत आहे. मात्र, बऱ्याचदा जनावरांच्या खानपानावर विशेष लक्ष न दिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. त्यामुळे डेअरी व्यवसाय सुरू करण्याआधी जनावरांची देखभाल आणि आहाराबाबत शेतकऱ्यांना अधिक माहिती असणे आवश्यक असते. दुधाळ जनावरांना बरसीम गवत हे अतिशय लाभदायक आहे.

बरसीम हे गवत शेतकरी आणि पशुपालकांसाठी खूप महत्वाचे आहे. जनावरांच्या आहारात त्याचा समावेश केल्यास, दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. बरसीम गवत हे मेथीच्या भाजीप्रमाणे असलेले एक चारा पीक आहे. बरसीम नैसर्गिकरित्या उगवत नाही. परंतु जनावरांच्या चाऱ्यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. कडधान्य पीक म्हणूनही त्याची ओळख आहे. रब्बी हंगामात पाण्याची पुरेशी सोय असलेल्या भागात बरसीमची लागवड केली जाते. सुमारे दीड ते दोन महिन्यांनंतर बरसीमचे गवत कापणीला येते. हे गवत वेगाने वाढणारे गवत असून, ते ३५ दिवसांच्या अंतराने पाच ते सहा वेळा कापले जाऊ शकते. विशेष म्हणजे बरसीम पेरल्याने शेताची सुपीकताही वाढते.

कसे देतात जनावरांना बरसीम गवत : उन्हाळाच्या दिवसांमध्ये दुधाळ जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी पुरेसा हिरवा चारा व धान्याच्या कणेची व्यवस्था करणे आवश्यक असते. बरसीम गवत जनावरांचे दूध वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. ते कापून पेंढा मिसळल्याने फायदा होतो. प्रत्येक तीन किलो पेंढ्यामध्ये दीड किलो बरसीम गवत मिसळून दुधाळ जनावरांना खायला देणे चांगले असते. पौष्टिक गुणधर्मांनी समृद्ध असण्यासोबतच ते पचायलाही सोपे असते. दुधाळ जनावरांना दररोज बरसीम खायला दिल्याने त्यांचे दूध वाढते आणि त्यांचे आरोग्यही चांगले राहते.

आर्थिक स्थिती सुधारण्यास होते मदत : जर तुमच्याकडे पाण्याची सोय असेल तर लहान जागेतही तुम्ही बरसीम गवत लागवड करू शकतात. हे गवत वेगाने वाढण्यासोबतच जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी मदत करते. ग्रामीण भागात अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बरसीमची लागवड करतात. याशिवाय शहरांमध्येही राहणाऱ्या दुग्ध उत्पादकांना या गवताची विक्री केली जाते. बरसीम गवतामुळे जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही सुधारण्यास मदत करतो.

कांदा पिकावरील हा आहे सर्वात धोकादायक रोग

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.

कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात? मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची

सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात. ज्यामुळे याचा संपूर्ण कांदा पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. कांदा पिकावरील पीळ रोगाचे मुख्य कारण म्हणजे थ्रिप्स कीटक आहेत. कांदा पिकावर थ्रीप्स किडीचा प्रादुर्भाव असल्यास, हे थ्रिप्स कांद्याच्या मऊ भागांना संक्रमित करतात आणि त्यानंतर त्या ठिकाणी बुरशीची वाढ सुरू होते. आणि कांद्याच्या पिकावर पीळ रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

पीळ रोग नियंत्रणासाठीचे उपाय : कांदा पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. कांद्याचे प्रमाणित बियाणे वापरावे. ज्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. २ किंवा ३ वर्षांनी पिकांची आलटून पालटून लागवड करावी. ज्यामुळे जमिनीची उपयुक्तता टिकून राहते. लागवड करताना रोपांच्या योग्य अंतरासाठी काळजी घ्या. मातीची परिक्षणासह खतांचा योग्य वापर करावा. कांदा लागवड करताना रोपांमध्ये योग्य अंतर ठेवावे. रोगाच्या प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून, प्रादुर्भाव झालेली झाडे उपटून नष्ट करावीत. शेतात प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे आणि ८ ते १० निळे चिकट सापळे लावावेत. नियमित तण नियंत्रण करावे, जेणेकरून रोगांचा प्रादुर्भाव होत नाही.

दिन विशेष

जागतिक दिवस
एप्रिल फूल दिन
उत्कल दिवस, ओरिसा

महत्वाच्या घटना

१६७९ : औरंगजेबाने हिंदूवर 'जिझिया' कर लावला.
१८७० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' यांच्या प्रेरणेने पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली.
१८८५ : मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मूळ 'पुणे सार्वजनिक सभा' आणि 'बॉम्बे असोसिएशन' या संस्थांमध्ये आहे असे मानले जाते.
१८९४ : छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
१९७५ : कॅनडामध्ये जगात सर्वात जास्त उंचीचा म्हणजे ५५५.३५ टॉवर बांधून पुर्ण झाला.
१९८२ : फॉकलंडचे युद्ध - अर्जेंटिनाने फॉकलंड बेटे पादाक्रांत केली.
१९८४ : सोयुझ टी-११ या अंतराळयानातुन राकेश शर्मा या पहिल्या भारतीय अंतराळवीराने उड्डाण केले. तो ७ दिवस २१ तास व ४० मिनिटे अवकाशात होता.
१९८९ : ताणलेले संबंध सुधारण्यासाठी रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांचे क्यूबातील हॅवाना येथे आगमन
१९९० : स्मॉल इन्डस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाची स्थापना
१९९८ : कोकण रेल्वेवरून धावणारी निजामुद्दीन तिरुअनंतपुरम राजधानी एक्स्प्रेस या गाडीचा प्रारंभ झाला.
२०११ : अठ्ठावीस वर्षांच्या कालखंडानंतर भारतचा क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत विजयी.
२०११ : क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत भारताचा २८ वर्षांच्या कालखंडानंतर विजय.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१८ : फ्रॅन्सिस्को मारिया ग्रिमाल्डी - इटालियन गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २८ डिसेंबर १६६३)
१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८०५ : हान्स अँडरसन - डॅनिश परिकथालेखक (मृत्यू: १८७५)
१८७५ : वॉल्टर ख्राइसलर - 'ख्राइसलर' कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४०)
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८९८ : हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय - हिन्दी चित्रपटांतील प्रसिद्ध चरित्र अभिनेते. त्यांच्या 'साहिब, बिबी और गुलाम', 'बावर्ची' इ. चित्रपटांतील भुमिका विशेष गाजल्या. ते कवी (इंग्रजी), नाटककार, संगीतज्ञही होते. (मृत्यू: २३ जून १९९० मुंबई, महाराष्ट्र)
१९०२ : बडे गुलाम अली खाँ ऊर्फ 'सबरंग' - पतियाळा घराण्याचे गायक व वीणावादक, त्यांच्या 'याद पियाकी आये', 'का करु सजनी' इ. ठुमर्या लोकप्रिय आहेत. (मृत्यू: २५ एप्रिल १९६८ हैदराबाद, तेलंगण)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९२६ : सूर्यकांत रामचंद्र खांडेकर - कवी व गीतकार (मृत्यू: १५ जून १९७९)
१९४२ : भारतीय इंग्रजी-अभिनेते रोशन सेठ यांचा जन्म.
१९६२ : जयाप्रदा - प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य.
१९६५ : नाझिया हसन, हिंदी पॉप गायिका.
१९६९ : हिंदी चित्रपट अभिनेता अजय देवगण यांचा जन्म.
१९७२ : भारतीय नृत्यदिग्दर्शक रेमो डिसूझा यांचा जन्म.
१९८१ : भारतीय स्टँड-अप कॉमेडीयन कपिल शर्मा यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ.
१८७२ : सॅम्युअल मोर्स - 'मोर्स कोड' व तारायंत्राचे जनक आणि चित्रकार (जन्म: २७ एप्रिल १७९१)
१९९२ : आगाजान बेग ऊर्फ आगा - आपल्या निखळ विनोदानी रसिकांच्या पसंतीस उतरलेले अभिनेते
१९३३ : के. एस. रणजितसिंहजी - कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (जन्म: १० सप्टेंबर १८७२)
२००५ : पोप जॉन पॉल (दुसरा) (जन्म: १८ मे १९२०)
२००९ : गजाननराव वाटवे - गायक व संगीतकार (जन्म: ८ जून १९१७).

सतरा जलसिंचन योजनांना तीन कोटींचे अनुदान

पुणे : राज्यातील १७ उपसा सहकारी जलसिंचन योजनांना तीन कोटी पाच लाख रुपयांचे अनुदान राज्य सरकारने मंजूर केले आहे. शासनाव्यतिरिक्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी उपसा जलसिंचन योजना राबविल्या, मात्र त्या आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने त्यांना हातभार लावण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येते. त्यानुसार २०२३-२४ च्या आर्थिक वर्षासाठी हे अनुदान मंजूर केले आहे.

राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्या प्रकल्प खर्चात गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे अल्प आणि सीमांत शेतकरी सभासदच नव्हे तर मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांना सुद्धा वाढता प्रकल्प खर्च पेलवत नाही. शासनाच्या खर्चाने ज्या लहान मोठ्या पाटबंधारे योजना हाती घेण्यात आल्या, त्या योजनांच्या लाभक्षेत्रात कोणत्याही खर्चाशिवाय सिंचन व्यवस्था करण्याचे ठरविल्यास त्याचा योजनांचा संपूर्ण खर्च त्यांना स्वतः: करावा लागतो. त्यामुळे उपसा जलसिंचन योजनांच्या लाभधारक सभासदांवरील खर्चाचा बोजा कमी करून तो काही प्रमाणात शासनाकडून उचलला जावा, यासाठी १९९४ पासून जलसिंचन योजनांना अनुदान स्वरूपात अर्थसाहाय्य केले जाते. त्यानुसार हे अनुदान मंजूर केले आहेत.

या अनुदानासाठी उपसा जलसिंचन संस्थांना देण्यात आलेली मंजुरी, प्रस्तावाबरोबर सहकार आयुक्तांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांत विसंगती आढळल्यास अनुदान व्याजासह वसूल करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. सिंचन योजनेने प्रकल्प खर्चासाठी ज्या बँकेकडून कर्ज घेतले आहे, त्या बँकेच्या नावाने धनादेश काढण्यात येणार आहे. ही रक्कम कर्जाच्या रकमेपोटी समायोजित करण्यात येणार आहे.

पोलिस अधीक्षकांचे निवासस्थान घाणीच्या विळख्यात

तुंबलेल्या नाल्यांमुळे आरोग्य धोक्यात: नगरपरिषदेचा ढिसाळ कारभार; पोलिस अधिक्षकांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

शहरातील पोलिस वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निवासस्थान तसेच कार्यालयाभोवती घाणीचे साम्राज्य पसरलेले असुन पोलिस अधिक्षक निवासस्थान, पोलिस अधिक्षक कार्यालय याठिकाणी नाल्या तुंबलेल्या अवस्थेत असुन कचरा साचल्याने आरोग्याचे संकट निर्माण झाले असून डेंग्यू मलेरियासह जलजन्य आजारांचा धोका असुन तातडीने नालेसफाई करण्यात यावी जंतुनाशक औषधांची फवारणी करण्यात यावी तसेच जिल्हाधिकारी निवासस्थानासह ईतर वरिष्ठ अधिकारी यांच्या निवासस्थाने,कार्यालये तसेच बीड शहरातील ईतर ठिकाणी ठेवलेल्या कचराकुंडीतील कच-याची नियमित विल्हेवाट लावण्याची उपाययोजना करण्यात यावी आणि बंद अवस्थेतील घंटागाड्या सुरू करण्यात याव्यात अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर, जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस च-हाटकर,सुदाम तांदळे यांनी केली आहे.

पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना वरीष्ठ अधिकारी यांचे निवासस्थान तसेच कार्यालये याठिकाणी तुंबलेल्या नाल्यांची अवस्था, कचराकुंड्यांची अवस्था सांगितल्यानंतर बीडचे नागरीक फार सोशिक अशी प्रतिक्रिया देत, संबंधित निवेदनाच्या अनुषंगाने नगरपरिषदेला पत्र व्यवहार करतो म्हणाले. बीड शहरातील नागरीकांसह वरीष्ठ अधिकारी यांचे निवासस्थान तसेच कार्यालय उदा. पोलिस अधिक्षक निवासस्थान तसेच पोलिस अधिक्षक कार्यालय आदि ठिकाणी नगरपालिकेकडुन नियमित नालीसफाई होत नसल्याने बहुतांश नाल्यांमध्ये कचरा साठला आहे.त्यामुळे नाल्या तुंबल्या असुन गटारीचे पाणी रस्त्यावर येऊन घाणीचे साम्राज्य पसरले आहे.त्यामुळे डेंग्यू मलेरियासह जलजन्य आजारांची साथ पसरून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.त्यामुळे तुंबलेल्या नाल्यांची साफसफाई करण्यात यावी, जंतुनाशक औषधांची फवारणी करावी अशी मागणी करण्यात आली आहे. बीड शहरातील गेल्या कित्येक दिवसांपासून नगरपालिकेच्या ढिसाळ कारभार समोर येत असुन पालिकेच्या वतीने कचरा टाकण्यासाठी शहरातील काही भागांमध्ये कचराकुंडी ठेवण्यात आल्या आहेत या कचराकुंडी मधील कचरा नियमित घेऊन जाण्याचे काम पालिकेकडून केले जात नसल्याने कचरा रस्त्यावर येत असल्याने रस्त्यावर दुर्गंधी पसरली असुन याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी. शहरातील काही भागांमध्ये पालिकेने घरातील कचरा घेऊन जाण्यासाठी घंटागाड्या सुरू केल्या होत्या मात्र गेल्या काही दिवसांपासून यख गाड्याही दिसून येत नसल्याने त्या बंद झाल्या की काय?असा प्रश्न नागरिकांना पडला असुन बंद असलेल्या घंटागाड्या तातडीने सुरू कराव्यात.

अंबाजोगाई तालुक्यात ६३ हजार जनावरांचे लाळ खुरकुत प्रतिबंधक लसीकरण



अंबाजोगाई । प्रतिनिधी

लाळ खुरकत या रोगामुळे पशुधनाचे मोठे नुकसान होते. या पार्श्वभूमीवर लाळ रोगाविरुद्ध प्रतिबंधक-खुरकुत लसीकरण करण्यात आले आहे. तालुक्यात ६३ हजार ४८६ जनावरांची लसीकरण करण्यात आले. यामुळे लसीकरण करण्यात आलेल्या पशुंना रोगाचा संभाव्य धोका टाळण्यास उपायोग होणार आहे.

शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायकरतात. त्यामुळे दुभत्या जनावरांची व पशुंची संख्या देखील मोठ्या प्रमाणात आहे. या दिवसांत जनावरे आजारी पडली तर त्याचा दुधावर परिणाम होतो. यासह खरिप हंगामातील शेतीतील पेरणी व अंतर्गत मशागतीची कामे ही बैलांच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळेच पशुपालकांनी खबरदारीचा उपाय म्हणुन जनावरांना लसीकरण करून घेण्यास महत्व देतात. सध्या तालुक्यात लाळ खुरकूत या आजाराची प्रतिबंधात्मक लस जनवारांना देण्यात आली.

तालुक्यातील पशु चिकित्सालयात गाय, म्हैस वर्गीय जनावरांना लस देण्यात आली. अंबाजोगाई तालुक्यात गायवर्गीय जनावरे ३१ हजार ७७७ तर म्हैसवर्गीय ३१ हजार ७०९ जनावरे आहेत. सर्व जनावरांचे लसीकरण करण्यात आल्याचे तालुका पशुधन अधिकारी डॉ. बाळासाहेब गायकवाड यांनी सांगितले.

ताप येणे, खाणे पिणे कमी किंवा बंद होणे, तोंडात जिभेवर, हिरड्यावरील श्लेष्मल व खुरातील बेचक्यात फोड येतात. ते फुटून त्याचे वर्ण बनतात. तोंडातून लाल गळते व नाकातून स्त्राव वाहतो. जनावरे लंगडतात व कधीकधी तर संपूर्ण खुर बाहेर येते. गाय, म्हशीच्या कासेवर कधी कधी फोड व वर्ण होऊन स्तनदा होतो. संसर्गामुळे कळपातील गुरांनाही आजाराची लागण होते. यावर्षी अपुऱ्या पावसामुळे पाणी टंचाई जाणवत आहे. ग्रामीण भागात असलेल्या तलावमध्ये अवैधरीत्या मोटारी टाकून पाणी उपशा सुरु आहे. यामुळे जनावरांना पाणी पाजण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणी येत आहे. ग्रामीण भागात तहसीलदार विलास तरंगे यांच्या दुर्लक्षामुळे पाणी उपाशा होत असून यामुळे मुक्या जनावरांना पिण्यास पाणी मिळत नसल्याचा आरोप पशुपालकांतून होत आहे.

गणपती चौंडेश्वरी मंदीर वडवणी येथे गाथा पारायण

तुकाराम बीजेनिमित्त अखंड महिनाभर अध्यात्मिक पर्वणीचा लाभ

वडवणी । प्रतिनिधी

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविधी परोपकारे वैराग्याचे महामेरु जगद्गुरु श्री.संत तुकाराम महाराज यांच्या ३७४ व्या सदेह वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त श्री.गणपती आणि चौंडेश्वरी मंदिर वडवणी याठिकाणी तुकाराम बीजे निमित्त अखंड महिनाभर ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या कुशल मार्गदर्शनाने आणि नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे उत्साहामध्ये आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रविवार दि.२५ फेब्रुवारी २०२४ ते मंगळवार दि.२६ मार्च २०२४ या एका महिन्याच्या कालावधीमध्ये संत तुकाराम महाराज यांच्या गाथेचे अतिशय उत्साहामध्ये तब्बल ५० लोकांच्या उपस्थितीमध्ये पारायण संपन्न झाले.

त्याचप्रमाणे सोमवार दि.११ मार्च २०२४ ते मंगळवार दि.२६ मार्च २०२४ या कालावधीमध्ये श्री.संत महिपती महाराज लिखित तुकाराम चरित्र या ग्रंथाचे ओवीबध्द निरुपण करण्यात आले. त्याचप्रमाणे बुधवार दि.२७ मार्च २०२४ या दिवशी सकाळी १० वाजता ह.भ.प.भागवताचार्य सुधाकर महाराज चिनके यांच्या प्रासादिक वाणीतून तुकाराम बीजे निमित्त भव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आणि त्यानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाच्या भोजनाचा लाभ प्राप्त झाला. सविस्तर वृत्तांत असा की, दि.२५ फेब्रुवारी २०२४ पासून सुरु झालेल्या गाथा पारायण यासाठी अनेक लोकांनी उपस्थिती लावली. यामध्ये अभंग गायनासाठी सर्जेराव महाराज आळणे, गुरुप्रसाद माळवदे, दादासाहेब भंडारे, प्रकाश कुरकुटे सर, सुदाम खाटवकर सर आणि समस्त भक्त मंडळी इत्यादींनी गायनामध्ये आपल्या विविध सुंदर चाली लावून अभंगाचे दररोज गायन केले. या पारायणासाठी वडवणी शहरातील नामांकित उद्योगपती, पदाधिकारी, नोकरवर्ग, व्यापारी वर्ग इत्यादी अतिशय उत्साहाने सहभागी झाली होते. त्याचप्रमाणे महिला मंडळींचीही विशेष उपस्थिती होती. श्री.संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील ४०९३ अभंगांचे पारायण करण्यात आले. त्याचप्रमाणे संत तुकाराम महाराजांच्या चरित्राचे निरुपण वाचक ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके, पंडित नाना लोकरे आणि सूचक विठ्ठल महाराज गायकवाड यांनी केले. तसेच सुदाम खाटकर

सर, प्रकाश कुरकुटे सर यांनीही विशेष उपस्थिती दर्शवली. संत तुकाराम महाराज यांच्या चरित्रातील विविध भावपूर्ण प्रसंग, त्यांनी केलेल्या पांडुरंगाच्या निस्सीम भक्ती आणि समाजातील अनिष्ट कर्मकांड आणि चालीरितींवर केलेल्या प्रहार या विषयावर प्रकाश टाकला. दि.२६ मार्च २०२४ या दिवशी सायंकाळी ५ वाजता श्री.तुकाराम चरित्र या ग्रंथाची सांगता करण्यात आली. आणि रात्री ९ वाजता गाथा पारायणाची सांगता करण्यात आली. त्याचप्रमाणे दि.२७ मार्च २०२४ या दिवशी सकाळी १० ते १ या कालावधीमध्ये ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांचे तुकाराम बीजेनिमित्त सुश्राव्य असे हरिकीर्तन संपन्न झाले. त्याचप्रमाणे लागलीच श्री.गणपती चौंडेश्वरी मंदिर याठिकाणी उपस्थित सर्व भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. जवळपास या कार्यक्रमाला वडवणी परिसरातील तब्बल ५०० अबालवृध्दांनी उपस्थिती लावली. संत तुकाराम महाराजांनी केलेली भव्य विठ्ठलाची भक्ती आणि समाजातील अनिष्ट रुढी परंपरा आणि भेदभाव यावर केलेला प्रहार तुकाराम चरित्राच्या माध्यमातून आणि अभंग गाथा पारायणाच्या माध्यमातून या कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या सर्व भाविक भक्तांना परिचय झाला. तुकाराम महाराजांचे चरित्र आणि अभंग गाथेला उजाळा मिळाला. अतिशय उत्साहामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या आयोजन आणि यशस्वीतेसाठी श्री.गणपती आणि चौंडेश्वरी भक्त परिवार, आणि श्री.गणपती चौंडेश्वरी ट्रस्टचे विशेष सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाचे दररोज फेसबुक लाईव्ह सुदाम खाटवकर सर यांनी फेसबुक पेजवर केले आणि व्यापक प्रसिध्दी दिली. या कार्यक्रमासाठी विशेष कुशल मार्गदर्शन आणि नियोजन ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांचे लाभले. वडवणी आणि परिसरामध्ये या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दुर्धर आजारांवरील औषधींच्या डिझाईनला केंद्रातर्फे पेटंट

शिरूर । प्रतिनिधी

कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयाचे प्रा.उध्दव निवृत्ती चौधर यांनी कर्करोग,एच.आय.व्ही, डायबिटीज सारख्या दुर्धर आजारांवर प्रभावी उपचार करण्यासाठीच्या औषधींचे डिझाईन बनविले आहे.त्या डिझाईनला केंद्र शासनाच्या कार्यालयाने स्वामित्व हक्क (पेटंट) नुकतेच जाहीर केले.चौधर यांनी मिळविलेल्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांच्या हस्ते महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.याच संशोधनाच्या शृंखलेतील दुसऱ्या टप्प्यातील संशोधनाच्या पेटंटसाठीही प्रस्ताव सादर झाला असून आगामी काळात त्याला देखील पेटंट जाहीर होईल असा विश्वास संशोधक डॉ.उद्धव चौधर यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केला.चार प्राध्यापकांनी क्लिक केमिस्ट्री विषयात संशोधन केले आहे.याच विषयात कॅरोलिन बर्टोझी,मॉर्टन मेल्डल आणि कार्ल बॅरी शार्पलेस यांना २०२२ या वर्षीचा

''क्लिक आणि बायोऑर्थोगोनल केमिस्ट्रीचा विकास'' यामध्ये संशोधनाला नोबेल पारितोषिक जाहीर झाले होते.क्लिक केमिस्ट्रीमध्ये विशिष्ट बायोमॉलिक्युलला किंवा सबस्ट्रेटला जोडण्याची एक पद्धत सतत विकसित करण्यात येत आहे.

पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयातील डॉ.अजय पाटील, सिल्लोडच्या इंद्रराज महाविद्यालयातील डॉ.चंद्रशेखर देवकाते, सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील प्रा.शाम टकले यांचे विषयातील संशोधनाला सहकार्य मिळाले आहे. कोरोनाच्या काळात रसायन शास्त्रातील संशोधनाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले होते.कालावधीत या चार प्राध्यापकांनी संशोधन करीत, विषाणू हा दिवसेंदिवस औषध प्रतिकारक बनत आहे.त्यातील रासायनिक बदल हा फक्त एकाच कार्यात्मक गटाला होऊन त्या कंपाऊंडमधील इतर गट हे तसेच राहिल्यास आपल्याला हवे असलेले उत्पादन आपण तयार करू शकतो. याविषयीचे डिझाईन तयार केले आहे. संशोधनात नैसर्गिक उत्पादनाच्या फंक्शनल ग्रुपमध्ये बदल करून आपल्याला आवश्यक असलेली औषधी निर्माण करता येते.त्यात विशेष म्हणजे एच.आय.व्ही,एड्स आणि डायबिटिस यासारख्या दुर्धर आजारावरील औषधी बनविण्यासाठी या डिझाईनची मदत होणार आहे. या संशोधनाचे स्वामित्व हक्क मिळण्यासाठी पेटंट कार्यालयाकडे १५ जानेवारी २०२४ रोजी प्रस्ताव सादर केला होता.त्यास २२ मार्च रोजी मान्यता मिळाली आहे. प्रा.चौधर यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित भैया क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेशजी मचाले, प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी अभिनंदन केले आहे.

सोन्नाखोटा शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हणजे गुणवत्तेची खाण असलेली शाळा म्हणून सर्वपरिचीत आहे. येथील विद्यार्थी प्रत्येक वर्षी हमखास नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र ठरतात म्हणजे ठरतातच. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी नवोदय प्रवेशासाठी या शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असून कु.स्वरा श्रीकृष्ण उंडाळे व चि.वरद विष्णू आंधळे या दोघांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादित केले आहे. त्यांच्या या यशाबध्दल त्यांचे, गुरुजनांचे व पालकांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

परिक्षा परिषद पुणे यांच्या वतीने दि.२० जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय गढी येथील इयत्ता सहावी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये वडवणी तालुक्यातील सोन्नाखोटा या शाळेतील दोन विद्यार्थी चि.वरद विष्णू आंधळे व

कु.स्वरा श्रीकृष्ण उंडाळे या दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामध्ये त्यांना मार्गदर्शन करणारे सोन्नाखोटा जिल्हा परिषद शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक ए.आर.मुंडे सर, गोरक्षनाथ मुंडे सर, गायकवाड मॅडम, अंगद मुंडे सर यांसह शाळेतील इतर सर्व शिक्षकांचे त्यांना योग्य मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर त्यांचे मार्गदर्शक अंगद मद्देवाड सर, पवन आरसेवार सर, बंकट काळे सर, समर्थ मार्गदर्शन केंद्राच्या श्रीमती.कुलकर्णी मॅडम यांचे देखील त्यांना मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या या यशाबध्दल माजी आमदार केशवराव आंधळे, वडवणी तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल भाऊ मुंडे, युवा नेते संजय भाऊ आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत भैय्या धस त्याचबरोबर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

जयकिसानचा शशांक जगताप नवोदय प्रवेशास पात्र

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी शशांक शेषराव जगताप हा जवहार नवोदय निवड परीक्षेव्दारे प्रवेशास पात्र ठरला आहे. त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गोर-गरीब, होतकरु आणि हुशार मुलांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश परीक्षेचे मार्फत नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जातो. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेऊन त्यांना नवोदय विद्यालयात प्रवेश दिला जातो. आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील पाचवीच्या वर्गातील विद्यार्थी शशांक शेषराव जगताप हा उतीर्ण झाल्याने नवोदय विद्यालयाच्या प्रवेशास पात्र ठरला आहे. त्याचबरोबर सातारा सौनिक स्कुल परीक्षेत ही तो उतीर्ण होऊन प्रवेशास पात्र ठरला आहे. त्याच्या यशा बद्दल संस्थेचे सचिव प्रा. जयजित शिंदे, सहसचिव सौ. व्हि. जे. शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. एन. के. हजारे, प्रा. पी. एस. तरकसे, यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी व गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

शेकटा येथील भस्मेश्वर जिर्णोद्धार व नंदिस्थापनेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

शिवलीला अमृत कथा व पारायण सोहळ्याचे आयोजन : भाविकांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

हभप गुरुवर्य महंत स्वामी निमगमानंदजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व महंत जनार्धन महाराज यांच्या अशिर्वादाने मौजे शेकटा येथील भस्मेश्वर मंदिराच्या जिर्णोद्धार नंदीस्थापनेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन हभप गोपाळ महाराज शास्त्री, हभप तुळशिदास महाराज शेकटेकर हभप नामदेव महाराज शेकटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि. ०२ एप्रिल २०२४ रोजी संत महंतांच्या उपस्थितीत प्रारंभ होत आहे. महंत जनार्धन स्वामी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता शनिवार दि. ०६ एप्रिल रोजी होणार आहे.

शेकटा येथील स्मशानभूती येथे पुरातण भस्मेश्वराचे पुरातन मंदिर असून शेकटा ग्रामस्थांच्या वतीने या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येणार आहे. या जिर्णोद्धार व नंदिस्थापनेनिमित्त ०२ एप्रिल रोजी संत महंतांच्या उपस्थितीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले असून या सप्ताहात शिवलीला अमृत? कथा व पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. दैनंदिन कार्यक्रमामध्ये

भव्य नंदी मिरवणूक

शेकटा येथील स्मशानभूमी येथील भस्मेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येणार असून दि. ०५ एप्रिल शुक्रवार रोजी संत महंतांच्या उपस्थितीत भस्मेश्वर मंदिरात नवीन मंदिची प्रतिष्ठापणा करण्यात येणार असून नंदीची गावात सवाद्याच्या गजरात मिरवणूक काढून स्थापणा करण्यात येणार आहे.

काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, शिवलिला अमृत पारायण, गाथा भजन, शिवलिला अमृत कथा, हरिपाठ, हरिकिर्तन व नंतर जागर असे नियोजित वेळेनुसार कार्यक्रम होतील. सप्ताहात किर्तन सेवा हभप विद्याताई जवळेकर, हभप विशाल महाराज कारंडे, हभप संतोष महाराज शास्त्री, हभप बालाजी महाराज शास्त्री यांचे किर्तन सेवा पार पडणार आहे. सप्ताहानिमित्त अनेक संत महंतांची उपस्थिती राहणार आहे. तसेच माजी मंत्री पंकजाताई मंडे, माजी मंत्री बालासाहेब दोडतले, सरपंच शिवप्रसाद खेडकर यांचीही सप्ताहास उपस्थिती राहणार आहे. सप्ताह यशस्वीतेसाठी माजी सरपंच भागवत महानोर, उपसरपंच नारायण महानोर, राजेंद्र महानोर, पत्रकार भाऊसाहेब महानोर, एलआयसी प्रतिनिधी शरद महानोर, ज्ञानोबा नागरगोजे, राजेंद्र नागरगोजे, लक्ष्मण महाराज लिमकर, मुरलीधर शेंबडे, शरद नागरगोजे, आसाराम शेंबडे, लहू शेंबडे, अमोल साळवे, रमेश माने, कचरु शेंडेकर, खंडू महानोर, भगवान शेंडेकरसह आदी परिश्रम घेत आहेत. या सपूर्ण सप्ताहाचे अभ्यासू सुत्रसंचालन प्रा. तुकाराम महानोर हे करणार आहेत. या सप्ताहामध्ये गावातील अनेक अन्नदाते आलेल्या भाविकांसाठी अन्नदानाचे कार्य करणार आहेत. तसेच सप्ताची महापंगत हभप परमेश्वर महाराज वाघमोडे यांच्या वतीने करण्यात येणार आहे. या सप्ताहास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

ॲड.अंकूश कांबळे यांनी पाच वर्षाच्या होणाऱ्या पोतराजाचे केस कापले

शिरूर । प्रतिनिधी

शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या आणि आपला परंपरागत व्यावसाय करण्यासाठी लहान मुलांचे केस वाढवून त्यांना पोतराज करण्याचे काम आजही समाजात मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे.परंतु या मुलांना परंपरागत व्यवसायापासुन बाजूला ठेवून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अंकूश कांबळे हे प्रयत्नशील असतात.ज्या मुलाला पोतराज करण्यासाठी कुटूंबीय आग्रही असतात अशा कुटुंबीयांची मुले भेटल्यानंतर अंकूश कांबळे हे क्षणाचाही विचार न करता त्यांचे तात्काळ केस कापण्याचे काम करतात.त्यांची हि समयसूचकता अनेक मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कारणीभूत ठरली आहे.३१ मार्च रोजी रविवारी शहरातील नगरपंचायत कार्यालयासमोर सायंकाळी चार वाजता संभाजीनगर येथील मयूर राजू बत्तीसे वय पाच वर्ष या मुलाला त्यांनी पोतराज होण्यापासून परावृत्त केले आहे.केस कापण्यासाठी सुरूवातीला विरोध करणाऱ्या राजुला कांबळे यांनी गोड बोलून

आणि नवीन कपडे घेवुन तयार केले.नंतर स्टेशनरी दुकानातून कात्री आणून डोक्यावरील सगळे केस एकसारखे केले.

चौकट

राजू केस कापण्यासाठी सुरूवातीला तयार होत नव्हता.त्यानंतर कांबळे यांनी त्याला तुला हिरो सारखे दिसायचे आहे ना असे म्हणत राजुला तयार केले.त्यानंतर राजू काहीही न बोलता केस कमी करेपर्यंत शांत बसून राहिला.या वेळी सामाजिक कार्यकर्ते ॲड.समिर पठाण यांनी मोलाची मदत केली.

लातूरमध्ये तिरंगी लढत

सव्वा लाख मतं घेणाऱ्या वंचितकडून उदगीरकरांना तिकीट; मविआचं टेन्शन वाढलं!

लातूर । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीने यंदाची लोकसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या पक्षाने नुकतेच ११ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. या पक्षाने माढा, सोलापूर यासारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांत आपले उमेदवार दिले आहेत. विशेष म्हणजे मराठवाड्यातही या पक्षाने नरसिंग उदगीरकर यांना तिकीट दिले आहे. उदगीरकर यांच्या उमेदवारीमुळे लातूरची तिरंगी लढत होणार असून येथे महाविकास आघाडीला चांगलाच फटका बसू शकते. सध्या या जागेवर भाजपचा खासदार आहे.

नरसिंग उदगीरकर यांना तिकीट

लातूर जिल्हा हा राज्याच्या राजकारणात महत्त्वाचा आहे. या जिल्ह्याने महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री दिले आहेत.ही जागा आपल्याच ताब्यात यावी, यासाठी प्रत्येकाचा आग्रह असतो. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीनेदेखील या जागेवर आपला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवला असून या पक्षाने येथे नरसिंग उदगीरकर यांना तिकीट दिले आहे. ते मुळचे उदगीर तालुक्यातील धोंडी हिप्परगा येथील रहिवाशी आहेत.

राष्ट्रवादीकडून तिकीट मिळवण्यासाठी केला होता प्रयत्न

लातूर हा राखीव लोकसभा मतदारसंघा त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून तिकीट मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. मात्र यात त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांना आता वंचित बहुजन आघाडीने निवडणुकीचे तिकीट दिले आहे.

२०१९ साली वंचितला१ लाख १२ हजार मते

उदगीरकर यांनी जिल्हा उद्योग केंद्राच्या व्यवस्थापकपदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. निवृत्ती घेतल्यानंतर ते राजकारणात सक्रिय झाले होते. यावेळी वंचितने त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे. दरम्यान २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने येथून राम गारकर यांना तिकीट दिले होते. त्यांना एकूण एक लाख १२ हजार मते मिळाली होती.

वंचित बहुजन आघाडीची दुसरी यादी

हिंगोली : डॉ. बीडी चव्हाण
लातूर : नरसिंगराव उदगीरकर
सोलापूर : काशिनाथ गायकवाड
माढा : रमेश नागनाथ बारस्कर
सातारा : मारुती धोंडीराम जानकर
धुळे : अब्दुर रहमान
हातकणंगले : दादासाहेब दादागौडा चौगौडा
रावेर : संजय पंडित ब्राह्मणे
जालना : प्रभाकर देवमन बाकले
मुंबई उत्तर मध्य : अब्दुल हसन खान
रत्नागिर- सिंधुदुर्ग : काका जोशी

महाविकास आघाडीला बसू शकतो फटका

लातूर हा गड कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. मात्र सध्या ही जागा भाजपच्या ताब्यात आहे. वंचितने या जागेवर उमेदवार उभा केल्यामुळे मतफुटी होण्याची शक्यता आहे. ज्याचा फटका मविआच्या उमेदवाराला बसू शकतो. त्यामुळे आगामी काळात नेमके काय होणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

धाराशिवमध्ये ओमराजे निंबाळकर विरुद्ध अर्चना पाटील लढत

राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढणार भाजप आमदाराची पत्नी

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिवमध्ये महायुतीच्या उमेदवाराचा तिढा अखेर सुटला आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला धाराशिवची जागा मिळाली आहे. मात्र या जागेवरुन भाजप आमदाराची पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढणार आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे धाराशिवमध्ये लोकसभेसाठी राष्ट्रवादीत हा मोठा पक्षप्रवेश होणार आहे. भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून धाराशिव लोकसभेची उमेदवारी मिळणार असल्याचे म्हटलं जात आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात धाराशिवमध्ये लोकसभेच्या उमेदवारीसंदर्भात नाट्यमय घडामोडी घडणार आहे. अर्चना पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशानंतर राणा जगजितसिंह पाटील मात्र भाजपमध्येच राहणार आहेत. अशातच धाराशिव लोकसभेसाठी पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेले निंबाळकर आणि पाटील कुटंबियांमध्ये सामना रंगणार आहे. गेल्या काही दिवसांपासून धाराशिवच्या जागेसाठी तिन्ही मित्रपक्षांमध्ये बैठकांचे सत्र सुरु होते. त्यानंतर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी देण्याचे निश्चित झाले. धाराशिवची जागा राष्ट्रवादीला मिळाल्याने धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चना पाटील यांना शिवाजी आढळराव पाटील यांच्याप्रमाणे पक्षप्रवेश देऊन उमेदवारी देण्यात येणार आहे. त्यामुळे आता धाराशिवमध्ये ओमराजे निंबाळकर विरुद्ध अर्चना पाटील अशी दिर भावजयीत लढत होणार आहे.

अर्चना पाटील यांची निवडणुकीसाठी जोरदार तयारी

उमेदवारीची अधिकृत घोषणा झाली नसली तर अर्चना पाटील या आधीच निवडणुकीच्या मैदानात उतरल्या आहेत. अर्चना पाटील यांनी महिलांसाठी विविध उपक्रम घेत प्रचार सुरु केला होता. महिलांसाठी चित्रपट, धार्मिक पर्यटनस्थळी सहली, मंगळागौरी स्पर्धा, हिरकणी महोत्सव, हळदी कुंकू, होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करुन अर्चना पाटील राजकारणात सक्रीय झाल्या होत्या.

महादेव जानकरांचा शक्तिप्रदर्शन करून अर्ज दाखल

परभणी । प्रतिनिधी

महायुतीतील राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार महादेव जानकर यांनी सोमवारी (दि.१) सकाळी ११ च्या सुमारास महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आपले तीन अर्ज दाखल केले. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री पंकजा मुंडे, रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत आदींची उपस्थिती होती.

यावेळी माजी मंत्री बबनराव लोणीकर, आमदार मेघना बोर्डीकर, आमदार बाबाजानी दुर्राणी, आमदार रत्नाकर गुट्टे, माजी आमदार मोहन फड, माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर, माजी खा. सुरेश जाधव, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राजेश विटेकर, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रवीण देशमुख, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकूटे, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, माजी महापौर, प्रताप देशमुख, भाजपचे विधानसभा प्रमुख आनंद भरोसे, विजय वरपुडकर, माजी आ. रामराव वडकुते आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सत्तेसाठी लाचारी पत्कारणे योग्य नाही –जयंत पाटील

मुंबई । प्रतिनिधी

लोकांनी उमेदवाराला खांद्यावर घेतले आणि निवडणूक लोकांनी हातात घेतली तर कोणतीही शक्ती त्या उमेदवाराचा पराभव करू शकत नाही. निलेश लंके हे स्थानिक आहेत, लोकप्रिय आहेत, सतत फिरतीवर असतात. त्यांच्या विधानसभा मतदारसंघात त्यांनी प्रचंड काम केले आहे आणि लोकप्रतिनिधी कसा असावा याचा आदर्श घालून दिला आहे. या लोकसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न सुटलेले नाहीत त्यामुळे हा उमेदवार आपण पुढे केला आहे. लंके इथल्या लोकांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचवतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

जयंत पाटील म्हणाले की, आज देशात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत तरी काही जण म्हणतात आम्ही काम करण्यासाठी सत्तेत जात आहोत. सत्तेसाठी लाचारी स्वीकारणे योग्य नाही अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी मांडली तसेच कोणत्या विचारामागे राहून आपण काम करतोय हे पाहणे गरजेचे आहे. राजकारणात विचार आणि आचार फार महत्वाचे असतात. शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या मागे लोक मोठ्या ताकदीने उभे आहेत. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी ही परिस्थिती बदलू शकतात यावर लोकांचा ठाम विश्वास आहे असेही यावेळी स्पष्ट केले.

जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, टिव्हीद्वारे जाहिराती प्रसारित केल्या जात आहेत. सर्वत्र सत्ताधारीच दिसतील अशी व्यवस्था केली जात आहे. जाहिरातींवर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असेल तर विचार करा यांची मिळकत किती असेल? या सरकारने इलेक्टोरल बॉंड्स नावाची व्यवस्था मध्यंतरी सुरू केली. विविध संस्थांच्या माध्यमातून यांनी पैसे घेतले त्याची माहिती गुप्त ठेवण्यात आली. लोक कोर्टात गेल्यावर सुप्रीम कोर्टाने सांगितले की सर्व व्यवहार जाहीर करा. हे जाहीर झाल्यावर कळले की निम्म्याहून अधिक पैसे हे भाजपाला मिळाले. ज्यांनी पैसे दिले त्यांच्यावर ईडी, आयटी या संस्थांद्वारे कारवाई सुरू होती. पैसे दिले तेव्हा सुटका झाली. हा उघड उघड भ्रष्टाचार आहे, भ्रष्टाचार कसा करावा याची नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रकार मागच्या पाच वर्षांत झाला. एकीकडे 'न खाऊंगा न खाने दुंगा' म्हणायचे आणि दुसरीकडे 'जो भी है वो मैंही खाऊंगा' असे केले जात आहे असा टोलाही यावेळी लगावला.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, टिव्हीवरील जाहिरातींच्या माध्यमातून काँग्रेसने ७० वर्षांत काय केले नाही हे सांगितले जात आहे. हे १० वर्षे सत्तेत आहेत, यांनी १० वर्षात काय केले याचीही एखादी जाहिरात करा. ७० वर्षांत काम केले म्हणून देश आज इथपर्यंत आला आहे. मागच्या १० वर्षात यांनी देश अधोगतीकडे नेला. आज देशातील तरुणांना रोजगार नाही. पीएच.डी झालेली मुले आज शिपायाच्या नोकरीसाठी अर्ज भरत आहेत. ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये आपल्या देशाचा नंबर १११ वा लागतो. भाजपा यावर उत्तर देईल का ? का देश पुढे गेला नाही? यांचे उत्तर काय असेल तर तुम्ही साठ वर्षात काय केले? आम्ही फक्त १० वर्षांचा हिशोब मागतोय तर यांची ही परिस्थिती आहे. टिव्हीवर जे दाखवले जाते ते फक्त दिसायला चांगलं आहे, खरी परिस्थिती तुम्ही आम्ही भोगतोय अशी टीकाही यावेळी केली.

भारतरत्नचे राजकारण दुर्दैवी; काँग्रेसचा केविलवाणा प्रयत्न –भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांची सडकून टीका

अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशाच्या राजकारणात काम करताना काँग्रेस पक्षाने नेहमीच संकुचित आणि अविचारी बुद्धीनं कारभार केला आहे. त्या पक्षाच्या अंगी मनाचा मोठेपणा कधीच नाही आणि नव्हता. अविवेकी असल्यानेच भारतरत्न पुरस्कारांच्या कार्यक्रमाचे देखील काँग्रेस राजकारण करू पहातात हे दुर्दैवी आहे. काँग्रेसचा हा केविलवाणा प्रयत्न असल्याची खरमरीत टीका भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न सन्मान महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू देताना क्षणभर व्यासपीठावर उपस्थित होत्या. त्यात

महिला विरोधी मानसिकता असण्याचा प्रश्नच उठत नाही. तुमच्या काळात पुरस्कार देताना तत्कालीन महामहीम राष्ट्रपती हे उभा रहायचे. या शब्दांत भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढविला. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी म्हटले आहे की, देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या शुभ हस्ते काल भाजपाचे जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला. यावेळी वृद्धापकाळाने आडवाणी त्यांच्या निवासस्थानी खुर्चीवर बसलेले शेजारी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी दिसतात. त्या दरम्यान सन्मान चिन्ह प्रोटोकॉल प्रमाणे महामहिम राष्ट्रपती यांनी उभा राहुन आडवाणीजींच्या हातात दिलं. त्यानंतर काही क्षणात त्या स्थानापन्न ही झाल्या. मात्र या देखण्या सोहळयाचं कौतुक करण्यापेक्षा नेहमीच्या सवयीप्रमाणे अविवेकी काँग्रेस पक्षाने राष्ट्रपतीजी उभा असताना एक फोटो काढत ट्विट केलं आणि भाजपची मानसिकता महिलांच्या विरोधी कशी असल्याचा सवाल उपस्थित केला ? वास्तविक पहाता चांगलं कुणाचं देखवत नसेल तर किमान नावं ठेवणे नको, ही खर्या अर्थाने भारतीय राजकारणाची संस्कृती आहे. पण, ज्या काँग्रेसने नेहमीच द्वेषाचं, सुडभाव वाढविण्याचं काम केलं त्यांची अजुनही दृष्टी आंधळीच असल्याचं प्रवक्ते कुलकर्णी यांनी म्हटलं. संकुचित विचारानं देश चालवला म्हणुनच खर्या अर्थाने स्वातंत्र्य मिळून देखील या देशाला अमृतकाल येण्यासाठी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाच्या उदयाची वाट पहावी लागली. वास्तविक पहाता भाजपानं एका आदिवासी, तेही सामान्य कुटुंबातील महिलेला राष्ट्रपती (पान ३ वर)

हिंगोलीत शिंदे गटाला उमेदवारी

भाजपचे योगी शाम भारती महाराज अपक्ष?

हिंगोली । प्रतिनिधी

भाजपचे अध्यात्मिक आघाडी प्रमुख तथा मिशन मोदी अगेन पीएमचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माहूर येथील योगी शाम भारती महाराज यांनी निवडणूक लढविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. योगी शाम भारती महाराज यांच्या शिष्यांनीही त्यांना उमेदवारी दाखल करण्याची गळ घातली होती. त्यामुळे अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

हिंगोली मतदारसंघ महायुती मध्ये शिंदे गटाकडे आला आहे.

हेमंत पाटील यांच्या उमेदवारीला भाजपच्या कार्यकर्त्यांनी टोकाचा विरोध केल्याने हेमंत पाटील यांच्या उमेदवारीवर टाच येत असताना पर्यायी दुसरा उमेदवार सुद्धा शिंदे गटाने बाबुराव कोहलीकर यांना पसंती दर्शविल्याने भाजपच्या गोटात प्रंचड संतापाची लाट असून, हिंगोलीची जागा भाजपला मिळावी हा अट्टाहास भाजपाच्या कार्यकर्त्यांनी लावून धरला आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघ भाजपच्या वाटायला यावा यासाठी भाजपाच्या प्रमुख इच्छुक नेत्यांनी एकत्रित येऊन राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांना भेटून विनंती केली होती. मात्र त्यांना यश आले नाही. हिंगोली लोकसभा मतदार संघ शिंदे गटाच्या वाट्याला गेला. दोन दिवसापूर्वी हिंगोलीत भाजपच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांची एक बैठक झाली त्यात हेमंत पाटलांच्या नावाला प्रचंड विरोध करत कार्यकर्त्यांनी गोंधळ माजविला. याची दखल महायुतीला घ्यावी लागली. भाजपच्या कार्यकर्त्यांची प्रखर इच्छाशक्ती व व्यक्तिक योगी शाम भारती महाराज यांच्या शिष्यांनीही महाराजांना निवडणूक लढविण्यासाठी हीच ती योग्य वेळ अशी साद दिल्याने माहूरचे योगी शाम भारती महाराज अपक्ष हिंगोली लोकसभेच्या रणसंग्रामात उतरणार असल्याची माहिती समोर येत आहे.

महायुतीमधील 'या' चार मतदारसंघामुळे जागावाटपाचा तिढा वाढला, वर्षावर पहाटे ३ वाजेपर्यंत बैठका

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये सुरु असलेला जागावाटपाचा तिढा काही सुटता सुटत नसल्याचे चित्र आहे. आता दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रकिया सुरु झाली असतानाही जागावाटपाचा अंतिम निर्णय होत नसल्याचे चित्र आहे. महायुतीमध्ये एकूण ४ जागांवरून तिन्ही पक्षात संघर्ष पाहायला मिळत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर आणि अजित पवारांच्या देवगिरी निवासस्थानी बैठकांवर बैठका सुरु आहे. तर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नाशिक आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग या चार मतदारसंघामुळे महायुतीमधील जागावाटपाचा तिढा कायम आहे.

धाराशिव मतदारसंघावर तिन्ही पक्षाचा दावा...

धाराशिव लोकसभा मतदारसंघावर महायुतीतील तिन्ही पक्षांनी एकाचवेळी दावा केला आहे. शिंदेसेना आणि राष्ट्रवादीत या मतदारसंघासाठी अधिक रस्सीखेच पाहायला मिळत आहे. तर भाजपने देखील दावा केला आहे. भाजपकडून सेवानिवृत्त आयएएस अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या नावाची चर्चा आहे. तर, घड्याळ चिन्हावर परदेशी यांनी रिंगणात उतरवावे असे राष्ट्रवादी गटात चर्चा आहे.

संभाजीनगरवर भाजप-शिंदेसेनेचा दावा...

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघावरून महायुतीमधी जागावाटपाचा तिढा पाहायला मिळत आहे. भाजपकडून या जागेवर दावा केला जात आहे. तर, दुसरीकडे शिंदेसेना देखील हा मतदारसंघ सोडण्यासाठी तयार नसल्याचे चित्र आहे. शिंदे गटाकडून मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांच्या नावाची चर्चा आहे. तर, भाजपकडून भागवत कराड इच्छुक आहेत.

नाशिक सर्वाधिक चर्चेचा मतदारसंघ...

महायुतीमध्ये जागावाटपात सर्वाधिक अडचणीचा ठरणारा मतदारसंघ म्हणून नाशिककडे पाहिले जात आहे. शिंदे सेना आणि राष्ट्रवादीत या मतदारसंघावर संघर्ष पाहायला मिळत आहे. शिंदे गटाकडून विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांना कामाला लागा अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून देण्यात आल्या आहेत. तर, आपल्या नावाची चर्चा थेट दिल्लीत झाल्याचा दावा राष्ट्रवादीचे छगन भुजबळ करत आहेत. अशात भाजपकडून देखील उमेदवाराची चाचपणी सुरूच असल्याची चर्चा आहे.

रत्नागिरी – सिंधुदुर्गसाठी उदय सामंत आग्रही...देण्याच्या हालचाली सुरु आहेत

रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघावरून शिंदेसेना आणि भाजपात एकमत होत नसल्याचे चित्र आहे. ही जागा शिवसेनेला मिळावी यासाठी उदय सामंत आग्रही आहेत. कारण, उदय सामंत यांचा भाऊ किरण सामंत या मतदारसंघातून लढण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र, भाजपकडून नारायण राणे यांना उमेदवारी देण्याच्या हालचाली सुरु आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

प्रशासन अधिकाऱ्याची लिपिकाकडे दहा हजार रुपयांची लाचेची मागणी

प्रलंबीत बील काढण्यासाठी मागितले पैसे

पुणे । प्रतिनिधी

लिपिक, मुख्य लिपिकांचे सहा महिन्याचे प्रलंबित 'ओव्हर टाईम' पगाराचे बिल काढायचे असेल, तर मला फाईलवर सही करायला दहा हजार रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय फाईलवर सही करणार नाही, अशी अजब मागणी महापालिकेतील कर आकारणी व कर संकलन विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याने केली आहे. याबाबत पालिकेच्या सहायक आयुक्तांनी सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल करत संबंधित प्रशासन अधिकाऱ्याचे बिंग फोडले आहे. यावर महापालिका आयुक्त शेखर सिंह हे संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करतात, याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागातील लिपिक आणि मुख्य लिपिक हे एक हजार कोटींचे उदिष्ट पुर्ण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहे. सकाळी लवकर कार्यालयात येऊन रात्री उशिरापर्यंत काम करत आहेत. पालिकेच्या लिपिक आणि मुख्य लिपिकांना अतिकालीन भत्ता देण्याची तरतूद आहे. प्रत्येक महिन्यात चोवीस तास ओव्हर टाईमचे बिल देण्यात येते. मात्र, कर संकलनच्या कर्मचाऱ्यांना जानेवारी ते मार्च २०२४ या तीन महिन्यासाठी ४८ तासांचे ओव्हर टाईम देण्याचा निर्णय करसंकलन विभागाने घेतला होता. थेरगांव कर संकलन विभागातील लिपिक कर्मचाऱ्यांना एप्रिल २०२३ पासून अतिकालीन भत्ता प्रलंबित आहे. अतिकालीन भत्ता काढण्यासाठी त्या कर्मचारी हे करसंकलन गटाचे काम सांभाळून ते आस्थापनेचे काम करावे लागत होते. त्यामुळे अतिकालीन भत्ता काढता आला नाही.

त्यामुळे थेरगांव करसंकलन कार्यालयातील लिपिक कर्मचाऱ्यांनी एप्रिल २०२३ ते ऑगस्ट २०२३ पर्यंत अतिकालीन भत्ता गट लिपिकांनी काढला. त्यानंतर सदरची फाईल ही सही करण्यासाठी करसंकलन विभागाचे प्रशासन अधिकारी राजाराम सरगर यांच्याकडे पाठवण्यात आली. ओव्हर टाईम फाईलवर सही करण्यास प्रशासन अधिकारी सरगर यांनी नकार दिला. त्यावर संबंधित लिपिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना फाईलवर सही नसल्याचे कारण विचारले. त्यावर त्यांनी फाईलवर सहीसाठी दहा हजार रुपये द्यावे लागेल, तुम्ही दहा हजार रुपये देणार असाल तरच फाईलवर सही करणार अथवा सही करणार नाही, असा संदेश सहायक आयुक्त श्रीकांत कोळप यांनी समाज माध्यमातून व्हायरल केला आहे.

दरम्यान, कर संकलनच्या लिपिक, मुख्य लिपिक हे अहोरात्र काम करुन मालमत्ता वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण करण्यास प्रयत्न करत आहेत. मात्र, त्याच कर्मचाऱ्यांचा ओव्हरटाईम भत्ता देण्यास वरिष्ठ अधिकारी लाचेची मागणी करत आहेत. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील हे संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ओव्हर टाईमचे प्रलंबित बिल काढण्यासाठी वरिष्ठ अधिकारी हे कर्मचाऱ्यांना वेठीस धरुन सहीसाठी पैसे मागत असेल, तर हे शंभर टक्के चुकीचे आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी महासंघाकडे त्या वरिष्ठांची तक्रार करावी, याबाबत प्रशासन अधिकारी राजाराम सरगर यांनी पैशाची मागणी केली असेल, तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. याकरिता महासंघाकडून आयुक्तांना भेटून कडक कारवाई करावी, म्हणून लेखी पत्र देण्यात येईल. - बबन झिंजुर्डे, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ, पिंपरी-चिंचवड महापालिका.

पुणे-सातारा महामार्गावर चक्का जाम..

नसरापूर : पुणे-सातारा महामार्गावरील शिवरे येथील उड्डाणपुलाचे काम संबंधित ठेकेदाराकडून नियोजनशून्य होत असल्याने पुणे-सातारा महामार्गावर तीन किलोमीटर वाहनाच्या लांब रांगा लागल्या होत्या. पुणे बाजूकडे जाणार्या रस्त्यावर वाहतूक कोंडीत भर पडली होती. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत वाहतूक संथगतीने सुरू असल्याने प्रवाशी त्रस्त झाले होते.

महामार्गावरील शिवरे (ता. भोर) येथील उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. रविवारी (दि. ३१) पुण्याकडे निघालेल्या प्रवाशांच्या वाहनांची महामार्गावरील मोठी गर्दी होती. उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने दोन्ही बाजूचे महामार्ग बंद करून वाहतूक सेवा रस्त्यावर वळविण्यात आली आहे; मात्र, सेवा रस्त्यावर मोठा गतिरोधक टाकल्याने वाहनांचा वेग सावकाश होत आहे.अचानक वाहने थांबली जात असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. वर्वे ते खोपी-बोरमाळपर्यंत वाहनाच्या लांब रांगा लागून वाहतूक धीम्या गतीने सुरू होती. वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी पोलिसांना तारेवरची कसरत करावी लागली. जोडून आलेल्या सुट्या संपल्याने चाकरमानी पुणे, मुंबईकडे जाण्यासाठी बाहेर पडले होते. त्यातच उड्डाणपुलाचे काम सुरू करणार्या ठेकेदाराकडून कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना न केल्याने वाहतूक कोंडीत रोजच भर पडत आहे. या वेळी अवजड वाहने, एसटी बस, ट्रक, खासगी कार, दुचाकी अशी वाहने खचाखच रस्त्यावर खोळंबली होती. तब्बल १० तासांहून अधिक काळ वाहतूक संथगतीने सुरू असल्याने प्रवाशासह, लहान मुले हैराण झाली होती.

पुणे-सातारा महामार्गावर वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली असून, याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. रविवारच्या वाहतूक कोंडीत दोन रुग्णवाहिका खोळंबल्या होत्या. यामुळे रुग्णांचा जीव गेल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल होत आहे.

जुन्नर तालुक्यातील काळवाडी येथे बिबट्याचा हल्ला; हल्ल्यात महिला जखमी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

काळवाडी(ता.जुन्नर) येथील येथील बेल्हेकर वस्ती शिवारातील मंगल नवनाथ बेल्हेकर या महिलेवर बिबट्याने हल्ला करून त्यांना जखमी केले. सदर घटना रविवारी(ता.३१) संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. मंगल बेल्हेकर यांनी सांगितले की त्या व त्यांचे पती नवनाथ बेल्हेकर हे शेतात काम करत असताना केळीच्या शेतातून येत बिबट्याने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.

'केळीच्या पानांचा आवाज आल्याने मी त्या दिशेने पाहिले असता एक मोठा बिबट्या माझ्याकडे येताना मला दिसला. त्या बिबट्याने अचानक माझ्यावर हल्ला केला. मी आरडाओरडा केल्याने बाजुलाच असलेले माझे पती नवनाथ बेल्हेकर हे देखील बिबट्याच्या दिशेने पळत आले. मोठ्याने ओरडल्यामुळे बिबट्याने मला सोडले व तो बाजुच्या शेतात पळुन गेला'. या हल्ल्यात मंगल बेल्हेकर यांच्या खुब्याला जखम झाली असुन त्यांना पिंपळवंडी येथे उपचारासाठी नेण्यात आले.

सदर घटनेची माहिती वनविभागाला कळवली असता वनविभागाचे वनपाल एस.के.साळुंखे यांनी सदर घटनेची माहिती घेतली. रविवारी सकाळी देखील काळवाडी येथील एका वृद्धावर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याची माहिती काळवाडीचे अजय बेल्हेकर यांनी दिली. भविष्यात कोणतीही जीवित हानी होऊ नये म्हणुन वनविभागाने लवकरात लवकर बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

डॉ.डी.वाय.पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर

पिंपरी । प्रतिनिधी

आकुर्डी येथील डॉ डी वाय पाटील इन्स्टिटच्यूट ऑफ इंजिनीअरिंग मॅनेजमेंट आणि रिसर्च आकुर्डी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यार्थ्यांचे सात दिवसांचे निवासी श्रमसंस्कार शिबिर दंडवाडी (ता.बारामती) येथे संपन्न झाले. यामध्ये २५ हुन अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन सरपंच संजय चांदगुडे, उपसरपंच गौरव चांदगुडे यांच्या हस्ते करण्यात आले.सात दिवसांच्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दंडवाडी व मंदिरांच्या साफसफाई बरोबरच गावाशेजारी असलेल्या वन संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. समाजमाध्यमे, अन्नाची विटंबना, कार्यकर्ता व नेता कसा असावा, या विषयांवर विद्यार्थ्यांसाठी व ग्रामस्थ विविध व्याख्याने राबवण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराचाया राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण होण्याचा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराज: आधुनिक भारतावर त्यांचा प्रभाव आणि स्मृतीतील स्थानिकता या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व ग्रामस्थ विविध व्याख्याने राबवण्यात आले .विद्यार्थ्यांनी लोकसंख्या नियंत्रण जागृती आणि नारीशक्ती या विषयावर पथनाट्ये सादर करत जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी श्रमदान करून पाणी अडवण्यासाठी बंधारा बांधण्यात आला.

विलास वाघचौरे, पांडुरंग सुपेकर , बापूराव चांदगुडे , समृद्धी देवकाते ,पर्यावरण जैवविविधित आणि अधिवास संवर्धन, मृदा व जलसंवर्धान ,लोकशाहीतील सहभाग आणि मतदान जनजागृती ,लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती या विषयांवर याविषयी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरा चा समारोप उपसरपंच गौरव पांडुरंग चांदगुडे , ग्रामसदस्य महेश चांदगुडे ,संदीप चांदगुडे यांच्या उपस्थितीत झाला.

प्रास्ताविक केतन घनवट यांनी तर जिज्ञासा नरवाडे यांनी स्वागत केले.

कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम चांदगुडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन साठी डॉ. डी वाय पाटील इन्स्टिटच्यूट ऑफ इंजीनियरिंग मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या प्राचार्या डॉ.अनुपमा पाटील , उपप्राचार्य डॉ सुनील डंभारे, कुलकचिव वाय के पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन बद्दल डॉ डी वाय पाटील शैक्षणिक संकुलाचे संचालक रिअर ऍडमिरल अमित विक्रम डी. वाय. प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस एस. पाटील, संस्थेचे चेअरमन सतेज डी. पाटील,संस्थेचे अध्यक्ष डॉ संजय डी. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भरारी पथकाकडून १ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथकाने मावळ तालक्यातील सिंहगड, कासुर्डे, शिरगाव व अंबी या ठिकाणी अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीच्या ३ ठिकाणांवर दारूबंदी गुन्ह्याअंतर्गत छापे मारून ३ गुन्ह्यांची नोंद करून १ लाख ४४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत १०५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारु, ३ हजार ६०० लिटर रसायन व गावठी हातभट्टी दारु निर्मीतीचे इतर साहीत्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापुढेही अवैध दारु व्यवसायाविरुद्ध अशाच प्रकारच्या मोहिमा आखून सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने नमूद केले आहे.

या कारवाईत दुय्यम निरीक्षक ए. बी. पाटील, व्हि.एम. माने, जवान पी. टी. कदम, एस.एस. पोंधे, ए. आर. थोरात, एस.सी. भाट, आर. टी. तारळकर व महिला जवान यु.आर. वारे यांनी सहभाग घेतला. गुन्ह्याचा तपास राज्य उत्पादन शुल्कच्या विभागीय भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक व्हि. एम. माने व दुय्यम निरीक्षक ए.बी. पाटील करीत आहेत.

माती उपसा तक्रारीवरुन दोन गटात हाणामारी; परस्परविरोधी तक्रारी दाखल

रावणगाव । प्रतिनिधी

उजनी धरणाच्या अधिकार्यांकडे केलेल्या तक्रारीमुळे माती उपसा बंद करावा लागला, याचा राग मनात धरून तक्रार करणारा आणि माती विक्रेता यांच्यात खानवटे (ता. दौंड) येथे तुफान मारामारी झाली. याप्रकरणी दौंड पोलिसात परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खानवटे गावाच्या हद्दीत असणार्या उजनी संपादित क्षेत्रातून काळी माती उचलून ती शेतात टाकण्यासाठी राजेगाव परिसरातून माती वाहतूक केली जात आहे, अशी तक्रार विलास जाधव याने उजनी लाभक्षेत्रातील अधिकार्यांकडे केली. त्यामुळे उजनी धरण प्रशासनाचे अधिकारी गावात आले आणि माती उपसा बंद झाला. त्याचाच मनात राग धरून काही ट्रॅक्टर मालक-चालक आणि माती विक्रेता शंभु राजेभोसले हे तक्रार करणारे विलास जाधव याच्या घरासमोरील रस्त्यावर आले.

त्यांनी विलास जाधव याला बाहेर बोलावले. घरासमोरील गर्दी पाहून जाधव याच्या घरातील महिलादेखील बाहेर आल्या. या वेळी चर्चा सुरू असताना शंभु राजेभोसले याने महिलांना मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावर एका महिलेने घरातील मिरची पावडर आणून जमलेल्या जमावाच्या दिशेने फेकली. मिरची पावडर टाकल्याने चिडलेले सर्व ट्रॅक्टर मालक-चालक, माती विक्रेता आणि तक्रार करणारे जाधव यांच्यामध्ये तुफान हाणामारी झाली. दरम्यान, मिरची पावडर जमावाच्या दिशेने फेकल्यामुळे जमाव शांत होऊन गर्दी कमी झाली. तेवढ्यात थोड्या वेळाने शंभु राजेभोसले हा मोटारीतून (एमएच ४२ एएस ५६३६) आला आणि तलवार घेऊन विलास जाधव याच्या अंगावर धावून गेला. तेवढ्यात विलास जाधव आणि त्याच्या नातेवाइकांनी त्यास पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याने तेथून पळ काढला. त्याची मोटार तेथेच राहिली. विलास जाधव व त्याच्या नातेवाइकांनी दगड मारून त्याची मोटार फोडली.

याप्रकरणी दौंड पोलिसात ताराबाई तुकाराम जाधव यांनी शंभु राजेभोसले यांच्या विरोधात फिर्याद दिली असून शंभु राजेभोसले यानेही तक्रार दाखल केली. त्यानुसार कुणाल विलास जाधव, विलास तुकाराम जाधव, राजेंद्र तुकाराम जाधव, विवेक राजेंद्र जाधव, अश्विनी राजेंद्र जाधव, शारदा दत्तात्रय जाधव, रूपा विलास जाधव (सर्व रा. खानवटे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. कोल्हेंनी आढळराव पाटलांना दिल्या 'गेट वेल सून'च्या सदिच्छा

पुणे : डॉ. अमोल कोल्हे यांनी मांध्यमांशी संवाद साधतांना आढळराव

पाटील यांच्यावर टीका केली. डॉ. कोल्हे म्हणाले की पराभूत मानसिकतेतून आढळराव पाटील यांची चिडचिड होते, ते वयस्कर आहेत त्यांना एवढीच सदिच्छा देईल की गेट वेल सून.

पुढे कोल्हे म्हटले की पवार साहेब आणि उद्धव ठाकरे यांना उदंड प्रतिसाद मिळत असल्याने बाहेरून नेत्यांना येऊन बैठका घ्यावा लागतात. आढळराव पाटलांनी यापूर्वी भाजप आणि अजित पवार गटातील कार्यकर्त्यांवर, नेत्यांवर जी विधान केली आहेत त्यामुळे नाराजी पाहायला मिळते. परंतु हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे.

पुणे वेधशाळा : कश्यपी सेवानिवृत्त; खोलेंच्या नावाची चर्चा

पुणे । प्रतिनिधी

पुणे वेधशाळेचे हवामान विभागप्रमुख हवामान शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी हे रविवारी (दि.३१) भारतीय हवामान विभागात ३२ वर्षे सेवा देऊन निवृत्त झाले. सर्व कर्मचारी, अधिकार्यांनी त्यांना निरोप दिला. उत्तम समन्वयक , मनमिळाऊ अधिकारी म्हणून ते या विभागात प्रसिद्ध होते. दरम्यान, त्यांचा पदभार डॉ. मेधा खोले घेणार असल्याची चर्चा या विभागात आहे. मात्र, अजून त्यांच्या नियुक्तीची घोषणा झाली नाही. डॉ. कश्पयी यांनी ३१ मार्च रोजी रविवार असूनही त्यांनी सुटी न घेता पूर्णवेळ काम करत आपला शेवटचा दिवस याच सेवेत घालवला.

डॉ. कश्यपी यांचा पदभार कोणाकडे दिला, याबाबत मात्र अधिकृत माहिती या विभागाने अजून दिलेली नाही. मात्र, यापूर्वीच्या हवामान विभागप्रमुख डॉ. मेधा खोले यांच्याकडे पुन्हा हा पदभार दिला जाऊ शकतो, अशी चर्चा या विभागातील कर्मचारी वर्गात गेला आठवडाभरापासून सुरू आहे.

गर्दी नियंत्रणासाठी आरपीएफने लढवली 'ही' शक्कल

पुणे । प्रतिनिधी

उन्हाळी सुट्या आणि सणासुदीमुळे पुणे रेल्वे स्थानकावरून उत्तर प्रदेश, बिहारला जाणार्या गाड्यांना प्रचंड गर्दी होत आहे. स्थानकावरील गर्दीमध्ये चेंगरा-चेंगरीसारख्या दुर्घटना घडू नयेत, यासाठी आरपीएफने (रेल्वे सुरक्षा बल) शक्कल लढवत, गर्दी रोखण्याचे आणि दुर्घटना टाळण्याचे नियोजन केले आहे. उन्हाळी सुट्यांमुळे पुण्यातून उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, दानापूर, गोरखपूर, मुझफ्फरपूरसह अन्य भागांत जाणार्या प्रवाशांची गर्दी वाढत आहे. या भागात जाणार्या बहुतांश गाड्या या रात्रीच्या सुमारास पुणे स्थानकावरून सुटतात. त्या वेळी गर्दी रोखणे अशक्य असते. त्यापार्श्वभूमीवर आरपीएफकडून या भागात

जाणार्या प्रवाशांना एका रांगेत उभे करून गाड्यांमध्ये बसवले जात आहे. त्यामुळे स्थानकावरील प्लॅटफॉर्मवर आणि गाडीमध्ये चढताना होणार्या चेंगराचेंगरीच्या घटना रोखण्यात आरपीएफला यश येत आहे.

काही महिन्यांपूर्वी झाली होती चेंगराचेंगरी

मागील काही महिन्यांपूर्वी पुणे स्थानकावरून जाणार्या याच गाड्यांना अशीच गर्दी झाली. मात्र, त्या वेळी प्रशासनाने या गर्दीकडे सर्रास दुर्लक्ष केले होते. त्या वेळी रात्रीच्या सुमारास दानापूरसाठी जाणारी गाडी पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर लागली आणि त्यामध्ये बसण्यासाठी प्रवाशांची एकच गर्दी उसळली. या गर्दीत अनेकांना श्वास घेता येईनासा झाला. चेंगरा-चेंगरी झाली. त्यामध्ये एक जण सापडल्याची माहिती समोर आली. मात्र, त्या वेळी आरपीएफ आणि लोहमार्ग पोलिसांनी सदरील व्यक्तीला दम्याचा त्रास असल्याचे सांगितले. मात्र, ही घटना चेंगराचेंगरीने घडली की दम्याच्या त्रास होता, याबाबत अद्यापही प्रश्नचिन्हच आहे.

सुट्या, सणासुदीमुळे उत्तर भारतात जाणार्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. मात्र, या गर्दीमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी आम्ही येथे सदैव तत्पर आहोत.

कोयत्याच्या धाकाने मोबाईल पळविणाऱ्या तिघांना अटक

शिरूर । प्रतिनिधी

रांजणगाव एमआयडीसी परिसरात कोयत्याचा धाक दाखवून मोबाईल चोरणार्या सराइतांना अटक करण्यात आली आहे. इस्तेखार इंतेजार शेख (वय १९), राजेश भगवान पाखरे (वय १९), गुरप्रित श्रीपती घोडके (वय १९, तिघेही रा. अहमदनगर) अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून ८२ हजार रुपयांचे पाच मोबाईल व स्कुटी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी जप्त केली.

रांजणगाव एमआयडीसी ठाण्याच्या हद्दीतील कंपनीत जाणा-या कामगारांना अडवून, त्यांना कोयत्याचा धाक दाखवत मोबाईल पळविण्याच्या घटनांत वाढ झाली होती.

गुन्हेगारांना अटक करण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न

सुरू केले होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यात रांजणगाव येथून फिर्यादी गजानन सुखलाल राऊत हे जात असताना त्यांना तीन अनोळखी व्यक्तींनी अडवून कोयत्याचा धाक दाखविला. त्यानंतर त्यांच्याकडील मोबाईल हिसकावला. दुसर्या घटनेत फिर्यादी मोहम्मद हुसेन मंसुरी हे पेप्सिको कंपनीसमोरून जात असतांना त्यांना स्कुटीवरून आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी रस्ता विचारण्याचा बहाण्याने अडविले. त्यानंतर त्यांचेकडील मोबाईल, रोख रक्कम पळविली. पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या सूचनेनुसार सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे अहमदनगर जिल्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली.

सदर आरोपींकडे तपास केला असता त्यांनी अशाच प्रकारे शिक्रापूर, कोतवाली, रांजणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली. सदर कामगिरी उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलिस कॉन्स्टेबल विजय शिंदे, उमेश कुतवळ, हवालदार विलास आंबेकर, वैजीनाथ नागरगोजे, तेजस रासकर यांनी केली.